**सुविचार**
परमात्मा में दृढ विश्वास का अर्थ है– निर्भयता।

विश्वसनीय बातम्यांचे एकमेश वृत्तपत्र

दैनिक **यशवंत**

✦लातूर/धाराशीव/बीड/नांदेड ✦/ रविवार दि. २ जून २०२४✦वर्ष ५२ वे✦अंक-१९५ ✦पृष्ठे८✦किंमत १रुपया ✦RNINO.39924/83 ✦OMD-426/2020-22✦

# तीन दिवसांनी पूर्ण झाले पंतप्रधान मोदींचे ध्यान

नवी दिल्ली- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची तीन दिवसीय ध्यानधारणा पूर्ण झाली आहे. पंतप्रधान मोदी कन्याकुमारी येथील विवेकानंद रॉक मेमोरियलमध्ये गेल्या ४५ तासांपासून ध्यान करत होते. ते तीन दिवस ध्यानमंडपममध्ये राहिले. या ध्यानमंडपाची खास गोष्ट म्हणजे हे तेच ठिकाण आहे जिथे स्वामी विवेकानंदांनी देशाचा दौरा केल्यानंतर तीन दिवस ध्यान केले होते. येथेच त्यांनी विकसित भारताचे स्वप्न पाहिले. या ठिकाणी पार्वतीने एका पायावर उभे राहून तप केले होते असे मानले जाते.



ध्यानाच्या दुसऱ्या दिवसाची सुरुवात पंतप्रधान मोदींनी सूर्योदयाच्या वेळी सूर्याला अर्घ्य देऊन केली. पीएम मोदींच्या ध्यानाचा व्हिडिओही समोर आला आहे, व्हिडिओमध्ये पीएम मोदी भगवा कुर्ता आणि गमछात होते. काल त्यांनी स्वामी विवेकानंदांच्या पुतळ्यासमोर बसून ध्यान केले. त्याच्या हातात जपमाळ होती आणि ओमचा आवाज गुंजत होता. पंतप्रधान मोदी गुरुवारी कन्याकुमारी येथे पोहोचले. पंतप्रधान दक्षिण भारतातील पारंपरिक पोशाखात धोतर परिधान करताना दिसले. त्याने ऑफ व्हाइट रंगाची शाल घातली होती. कन्याकुमारी येथे पोहोचल्यानंतर भगवती अम्मान मंदिरात प्रार्थना आणि पूजा केली. सार्वत्रिक निवडणुकीचा प्रचार संपल्यानंतर पीएम मोदी प्रत्येक वेळी अध्यात्मिक प्रवासाला निघतात आणि २०१९ च्या निवडणूक प्रचारानंतर ते केदारनाथला गेले होते आणि २०१४ मध्ये ते शिवाजी महाराजांशी संबंधित प्रतापगडला गेले होते.

विवेकानंदांनी आपल्या भारतभेटीत सामान्य लोकांचे दुःख, वेदना, गरिबी, स्वाभिमान आणि शिक्षणाचा अभाव जवळून ओळखला होता. विवेकानंद २४ डिसेंबर १८९२ रोजी पोहत समुद्रकिनाऱ्यापासून ५०० मीटर अंतरावर असलेल्या खडकावर पोहोचले. २५ ते २७ डिसेंबर या कालावधीत त्यांनी या खडकावर ध्यान केले. येथे त्यांनी भारताच्या भविष्यासाठी विकसित भारताचे स्वप्न पाहिले. हे तेच ठिकाण आहे जिथे त्यांनी भारत मातेचे दर्शन घेतले होते. या ठिकाणी त्यांनी आपले उर्वरित आयुष्य लोकांसाठी समर्पित करण्याचे स्वप्न पाहिले. विवेकानंद खडकावर विवेकानंद स्मारक उभारण्यासाठी बराच संघर्ष झाला.

## डोनाल्ड ट्रम्प दोषी



वॉशिंग्टन : अमेरिकी अध्यक्षपदाच्या निवडणुकीपूर्वी माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना मोठा झटका बसला आहे. व्यावसायिक नोंदीत फेरफार केल्याप्रकरणी न्यूयॉर्क येथील न्यायालयाने त्यांना दोषी ठरवले आहे. ट्रम्प यांच्यावर ३४ आरोप होते. हे सर्व आरोप सिद्ध झाल्याचे न्यायालयाने सांगितले. ट्रम्प यांना ११ जुलै रोजी शिक्षा सुनावण्यात येणार आहे. सध्या ते जामिनावर आहेत. गंभीर गुन्ह्यासाठी दोषी ठरविण्यात आलेले ट्रम्प हे पहिले माजी **(पान २ वर)**

# महाविकास आघाडीत 'ठाकरे'च बॉस पवार-कॉँग्रेसचाही मोठा फायदा

मुंबई : राज्यातील लोकसभेच्या निवडणुकीचे एक्झिट पोल समोर आले असून त्यामध्ये महाविकास आघाडीला मोठा फायदा होणर असल्याचं दिसून येतंय. महाविकास आघाडीला राज्यात २३ ते २५ जागा मिळणार असल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे, तर महायुतीला २२ ते २६ जागा मिळणार असल्याचा अंदाज आहे. एकंदरीत पाहता, दोन्ही गटांना फिफ्टी-फिफ्टी संधी असल्याचं दिसतंय. महाविकास आघाडीमध्ये सर्वाधिक जागा या शिवसेना उद्धव ठाकरे गटाला मिळतील असा अंदाज व्यक्त केला गेला आहे.

एबीपी माझा-सी वोटरच्या एक्झिट पोल समोर आला असून त्यामध्ये महाविकास आघाडी आणि महायुतीमध्ये जोरदार टक्कर असल्याचं दिसतंय. महाविकास आघाडीला मिळणाऱ्या जागांमध्ये शिवसेना उद्धव ठाकरे गटाने २१ जागा लढवल्या होत्या. त्यांना ९ जागा मिळण्याचा अंदाज व्यक्त केला गेला आहे. दुसऱ्या क्रमांकावर कॉँग्रेस राहण्याची शक्यता आहे. कॉँग्रेसने राज्यात १७ जागा लवढल्या होत्या. त्यामधील ८ ठिकाणी त्यांचे उमेदवार निवडून येतील असं सांगितलं जातंय.

शरद पवारांचे किती खासदार निवडून येणार?

राष्ट्रवादी कॉँग्रेसच्या शरद पवार गटाने राज्यातील १० ठिकाणी त्यांचे उमेदवार उभे केले होते. त्यापैकी ६ जागी त्यांचे खासदार निवडून येतील असा अंदाज एबीपी सी व्होटरमध्ये वर्तवण्यात आला आहे. त्याचसोबत एक अपक्षही निवडून येणार असल्याचं सांगितलं आहे. म्हणजे सांगलीमध्ये विशाल पाटील हे बाजी मारतील असा अंदाज सांगतोय.

उद्धव ठाकरेंना ९ जागांचा तोटा

गेल्या वेळच्या निवडणुकीमध्ये उद्धव ठाकरेंचे १८ खासदार निवडून आले होते. शिवसेना फुटल्यानंतर त्यापैकी १३ खासदार हे त्यांना सोडून गेले, तर पाच खासदार उद्धव **(पान २ वर)**

# हवाई प्रवास आता आणखी स्वस्त होणार

मुंबई : जून महिना सुरु होताच अनेक नियमांत बदल करण्यात आले आहेत. अशातच हवाई प्रवाशांसाठीही एक आनंदाची माहिती समोर येत आहे. गॅस सिलेंडरप्रमाणे आता लवकरच हवाई प्रवास देखील स्वस्त होणार आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, तेल कंपन्यांनी जेट इंधन म्हणजेच एअर टर्बाइन इंधन च्या किमतीत कमालीची घट केल्याचे दिसून येत आहे. देशांतर्गत मार्गांवर विमान उड्डाण करण्यासाठी वापरण्यात येणारे हे तेल तब्बल १ लाख रुपयांच्या खाली आले आहे. इतकेच नव्हे तर देशातील चार महानगरांमध्ये आंतरराष्ट्रीय मार्गांवर उड्डाण करणाऱ्या विमानांच्या इंधन दरातही मोठी कपात करण्यात आली आहे. यामुळे विमान कंपन्यांचा खर्च कमी होणार असल्यामुळे विमान कंपन्यांचे भाडेही कमी होणार आहेत.

मुंबईत सर्वात कमी दर

देशाची आर्थिक राजधानी मुंबईमध्ये जेट इंधनाच्या किमती सर्वात कमी आहेत. एटीएफ किमतीत प्रति किलोलिटर ६,३३९.४३ रुपयांनी घट झाल्यामुळे किंमत ८८,८३४.२७ रुपये प्रति किलोमीटर झाली आहे. दक्षिण भारतातील सर्वात मोठे महानगर असलेल्या चेन्नईमध्येही जेट इंधनाच्या किमती सर्वात मोठी कपात करण्यात आली असून दर ९८,५५७.१४ रुपयांवर आले आहे. सध्या दिल्ली, मुंबई, चेन्नई ही तीन महानगर वगळल्यास केवळ कोलकातामध्ये एटीएफचे दर एक **(पान २ वर)**



**उस्मानाबाद जनता सहकारी बँकेचे चेअरमन वसंतरावजी नागदे साहेब यांना सहकार बँकिंग क्षेत्रातील साल सन २०२४ या वर्षाचा सर्वोत्कृष्ट चेअरमन म्हणून पुरस्कार मिळालेला आहे त्याबद्दल विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीने मंदिरामध्ये मंदिर समितीचे अध्यक्ष श्री.गहिनीनाथ औसेकर महाराज यांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.**

# ग्राहकांना दिलासा! सलग तिसऱ्या महिन्यात गॅस सिलिंडरच्या दरात घट

मुंबई : सध्या सोनं चांदीचे दर गगनाला भिडत असताना अशातच ग्राहकांना एक दिलासादायक माहिती समोर आली आहे. जून महिन्याला सुरुवात झाली असून आजपासून वाहतुकीच्या अनेक नियमांत बदल झाले आहेत. त्यासोबत गॅस सिलेंडरच्या दरातही घट केली असल्याची आनंदाची माहिती मिळाली आहे.

सलग तीन महिन्यांपासून गॅस सिलिंडरच्या दरात घट

देशातील ऑईल कंपन्यांनी सलग तिसऱ्यांना व्यावसायिक गॅस सिलिंडरचे दर कमी केले आहेत. गेल्या तीन महिन्यांत चार महानगरातील व्यावसायिक गॅस सिलिंडर ११९ ते १२४ रुपयांनी स्वस्त झाले आहेत. तर जून महिन्यात व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या दरात ७० ते ७२ रुपयांनी घट झाली आहे.



व्यावसायिक गॅस सिलिंडर इतक्या रुपयांनी स्वस्त

आयओसीएलच्या माहितीनुसार, देशातील चार महानगरांत व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या दरात घट करण्यात आली आहे. दिल्ली आणि मुंबईमध्ये व्यावसायिक गॅस सिलिंडर ६९.५ रुपयांनी स्वस्त झाले आहे त्यामुळे आता दिल्ली आणि मुंबईत गॅस सिलिंडरचा दर क्रमशः १६७६ रुपये आणि १६२९ रुपयांपर्यंत खाली आला आहे. त्याचबरोबर कोलकत्ता शहरात व्यावसायिक गॅस सिलिंडर ७२ रुपयांनी स्वस्त झाला असून येथे सिलेंडरचा **(पान २ वर)**

# चेन्नई–मुंबई फ्लाईटमध्ये बॉम्ब ठेवल्याची धमकी


चेन्नई : चेन्नईहून मुंबईला जाणा–या इंडिगो विमानाबाबत एक मोठी माहिती समोर आली असून शनिवारी सकाळी मुंबईला जाणा–या इंडिगो विमानाला बॉम्बची धमकी मिळाली. फ्लाइट ६ ई ५३१४ चेन्नईहून सकाळी ७ वाजता उड्डाण केले.

सकाळी साडेनऊच्या सुमारास ते मुंबई विमानतळावर उतरले. विमानतळ अधिका–यांनी तातडीने कारवाई केली. सर्व प्रवाशांना विमानातून सुखरूप उतरवण्यात आले. सध्या संपूर्ण विमानाचा शोध सुरू आहे. इंडिगोने निवेदन जारी करून म्हटले आहे की, चेन्नईहून मुंबईला जाणा–या इंडिगो फ्लाइट ६ ई ५३१४ ला बॉम्बची धमकी मिळाली आहे. मुंबईत उतरल्यावर क्रूने प्रोटोकॉलचे पालन केले. सुरक्षा एजन्सीच्या सूचनेनुसार विमान निर्जन ठिकाणी नेण्यात आले.

सर्व प्रवासी विमानातून सुखरूप उतरले आहेत. सध्या विमानाचा शोध सुरू आहे. सर्व सुरक्षा तपासण्या पूर्ण झाल्यानंतर विमान टर्मिनल परिसरात परत आणले जाईल. अलीकडच्या विमानाला बॉम्ब धमकी मिळण्याची ही तिसरी घटना आहे. यापूर्वी दिल्लीहून बनारसला जाणा–या विमानालाही अशीच धमकी मिळाली होती. दिल्लीहून श्रीनगरला जाणा–या फ्लाईटमध्ये असाच एक प्रकार समोर आला आहे. आता शनिवारी चेन्नईहून मुंबईला जाणा–या फ्लाइटमध्ये अशीच एक चिठ्ठी सापडली. सुरक्षा यंत्रणांनी या प्रकरणाचा तपास सुरू केला आहे.

# पीओके पाकिस्तानचा भाग नाही

इस्लामाबाद : पाकिस्तानचे माजी पंतप्रधान नवाज शरीफ यांनी मान्य केले होते की पाकिस्तानने १९९९ मध्ये भारताशी केलेला करार तोडला आहे. आता पाकिस्तानने कब्जा केलेल्या काश्मीरबाबत, पीओकेविषयी पाकिस्तान सरकारच्या दाव्याने एकच खळबळ उडाली आहे. पीओकेमध्ये सध्या पाकिस्तानविरोधी नारेच दिल्या जात नाहीत तर मोठे आंदोलन पण छेडण्यात आले आहे. पाकिस्तानी लष्कर, पोलिस आणि नागरिकांमध्ये धुमश्र्चक्री उडालेली आहे. त्यातच पीओकेतील कवी आणि पत्रकार अहमद फरहद शाह हे दोन आठवड्यांपासून गायब आहेत. याप्रकरणात इस्लामाबाद हायकोर्टात याचिका दाखल करण्यात आलेली आहे. सुनावणीवेळी 'पीओके पाकिस्तानचा भाग नाही', असा कबुलीनामा सरकारी पक्षाने हायकोर्टात दिला. अर्थात यामुळे एकच खळबळ उडाली आहे.



पीओकेत सध्या पाकिस्तानविरोधी राग आळवण्यात आलेला आहे. येथील नामधारी सरकार आणि पाकिस्तानविरोधात जनतेत मोठा असंतोष आहे. त्यातच पीओकेतील लोकप्रिय कवी अहमद फरहाद हे गेल्या दोन आठवड्यापासून गायब आहेत. पोओकेतील आंदोलकांच्या मते, पाकिस्तान पोलिसांनी त्यांना तुरुंगात डांबले आहे. तर काहींच्या मते, ते भूमिगत झाले असतील. याप्रकरणी इस्लामाबाद हायकोर्टात सुनावणी झाली. त्यावेळी सरकारी वकिलांनी, 'अहमद फरहाद यांना अटक करण्यात आलेली नाही. त्यांना पाकिस्तान सरकार अटक करु शकत नाही, कारण पीओके हा आपला भूभाग नाही तर दुस–या देशाचा भाग आहे.' असा युक्तीवाद केला. सरकारी वकिलांच्या या युक्तीवादावर हायकोर्ट पण हैराण झाले. पीओके जर दुस–या देशाचा भाग आहे, तर मग तिथे पाकिस्तान रेंजर्स काय करत आहेत, असा सवाल हायकोर्टाने विचारल्यावर सरकारी पक्ष गोंधळला.

पाक पत्रकाराने सुनावले खडे बोल

पाकिस्तानेच पत्रकार हामिद मीर यांनी सरकारच्या या भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त केली. त्यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर पोस्ट शेअर केली. 'सरकारी वकिलांचा युक्तीवाद पीओकेच्या प्रकरणात अनेक प्रश्न उपस्थित करत आहे. जर स्वतंत्र काश्मीर आमचा नाही तर मग तिथे पाकिस्तानी लष्कर काय करत आहे?' असा सवाल त्यांनी उपस्थित केला. सध्याचे सरकार पीओकेबाबत नकारात्मक दिसून येत आहे. त्यांनी तिथल्या एका कवीचे अपहरण केले आहे. ते पण पीओकेतूनच, पण हायकोर्टात मात्र पीओके पाकिस्तानचा भाग नसल्याचा दावा करण्यात येत आहे. याचा अर्थ पीओकेवर ताबा मिळविणारे सैन्य पाकिस्तानचे आहे. पण पाकिस्तानच्या अधिकारक्षेत्रात पीओके नाही असा होतो असे मीर म्हणाले.

पीओकेत पाकबाबत रोष

**(पान २ वर)**




**वाराणसीमधील मतदान केंद्रावर मतदान केल्यानंतर काशी पिठाचे जगद्गुरु चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामिजी यांनी मतदान केले.**

# ईशान्य भारतात मॉन्सूनबरोबरच पुराचे संकट

नवी दिल्ली : देशातील बहुसंख्य जनता उष्णतेच्या लाटेमुळे त्रस्त झाली असताना ईशान्येतील राज्यांना मात्र अतिवृष्टीमुळे मे महिन्याच्या अखेरीसच पुराचा सामना करावा लागत आहे. 'रेमल' चक्रीवादळाच्या प्रभावामुळे अतिवृष्टी झाल्यानंतर वेळेआधीच दाखल झालेल्या मॉन्सूनने पावसाळ्याच्या सुरुवातीलाच ईशान्येतील नागरिकांची चिंता वाढविली आहे. आसाम आणि मणिपूरमधील ब्रह्मपुत्रा, बराक आदी नद्यांना महापूर आल्याने लोकांची झोप उडाली आहे.



आसाममध्ये पूरस्थिती आजही गंभीरच असून राज्यातील ९ जिल्ह्यांतील दोन लाख नागरिक प्रभावित झाले आहेत. राज्यात चक्रीवादळ, पूर आणि पावसाशी संबंधित विविध घटनांत सहा जणांचा मृत्यू झाला आहे. ब्रह्मपुत्र आणि बराकसह इतर नद्याही धोक्याच्या पातळीवरून वाहत आहेत. राज्यातील नागाव, करीमगंज, हैलाकंडी, प.कारबी अँगलाँन्ग, काच्छर, होजाई, गोलाघाट, कारबी ॲगलिंग आणि दिमा हसाओ या जिल्ह्यांना पुराचा सर्वाधिक फटका बसला आहे. रस्त्यांचे नुकसान झाल्याने बराक खो-यातील काच्छर, करीमगंज आणि हैलाकंडी या जिल्ह्यांचा उर्वरित ईशान्येशी संपर्क तुटला असून अनेक वाहने अडकून पडली आहेत.

राष्ट्रीय महामार्ग सहावरील २० मीटरचा रस्ता वाहून गेला आहे. 'रेमल' चक्रीवादळामुळे गती मिळाल्याने नैऋत्य मॉन्सून आसामसह ईशान्येतील इतर राज्यांतही गुरुवारी दाखल झाला. येत्या दोन दिवसांत आसाममध्ये काही जिल्ह्यांत मुसळधार पावसाचा इशारा हवामान खात्याने दिला आहे.

आसाममधील नुकसान

- कच्छर जिल्ह्यात पुरामुळे सर्वाधिक १,१२,२४६ लोक प्रभावित - करीमगंज मध्ये ३७ हजार तर होजाईत २२,०५८ व हैलाकंडीत १४,३०८ जणांना फटका. ३,२३८ हेक्टरवरील पिके पाण्यात, २,३४,५३५ प्राण्यांवरही परिणाम. ११० मदत छावण्यांत ३५, ६४० नागरिक आश्रयाला मणिपुरात राजभवनभोवती पाणी साचले

गेल्या काही दिवसांपासून कोसळणा-या मुसळधार पावसामुळे मणिपूरमध्ये राजभवनभोवतीही मोठ्या प्रमाणावर पाणी साचले आहे. इंफाळ खो-यात तीन जणांचा मृत्यू झाला असून पुराचा लाखो नागरिकांना फटका बसला आहे. इंफाळ नदीचे बंधारे ठिकठिकाणी फुटल्याने राजभवन परिसरात पाणी साठल्याची माहिती वरिष्ठ अधिका-यांनी दिली. मात्र, गेल्या दोन दिवसांच्या तुलनेत परिस्थिती सुधारली असून साठलेल्या पाण्याचा निचरा करण्यात येत आहे असेही त्यांनी सांगितले.

हवामानाचे यूपीत ५ बळी

प्रतिकूल हवामानाशी संबंधित विविध घटनांमुळे उत्तर प्रदेशात पाच **(पान २ वर)**

# सरकारी नोकरीमध्ये पदोन्नती मिळणे हा अधिकार नाही

## सर्वोच्च न्यायालयाचा मोठा निर्णय

मुंबई,१ – सरकारी नोकरदारांना पदोन्नती देण्यासंदर्भात राज्यघटनेत कोणताही उल्लेख करण्यात आलेला नाही. त्यामुळे नोकरदारांना पदोन्नती देण्याचे निकष, स्वरूप आणि त्यासाठी काय पात्रता असावी, हे ठरविण्यासाठी कायदेमंडळ आणि मंत्रिमंडळ स्वतंत्र आहे, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. न्या. जेबी पारडीवाला आणि न्या. मनोज मिश्रा यांचा समावेश असलेल्या सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठाने सदर निकाल दिला आहे. भारतातील कोणताही सरकारी कर्मचारी पदोन्नती हा त्याचा अधिकार असल्याचे सांगू शकत नाही, कारण संविधानात पदोन्नतीबाबत कोणताही उल्लेख नाही.

खंडपीठाने पुढे म्हटले की, कायदेमंडळ किंवा मंत्रिमंडळ पदोन्नतीच्या जागा भरण्यासाठी निकष आणि त्यासंबंधीची प्रक्रिया ठरवू शकतात. नोकरीचे स्वरुप आणि उमेदवाराचे काम यावर पदोन्नतीच्या पदांवर रिक्त जागा भरण्यासाठीची नियमावली केली जाऊ शकते. तसेच पदोन्नतीसाठी स्वीकारलेले धोरण हे सक्षम उमेदवारासाठी योग्य आहे किंवा नाही, याचे पुनरावलोकन न्यायालय करू शकत नाही.

गुजरातमधील जिल्हा न्यायाधीशांचा निवडीवरून पदोन्नतीचा वाद सुरू झाला. हा वाद सर्वोच्च न्यायालयात पोहोचला असताना खंडपीठाने यावर **(पान २ वर)**



**माझे पुतणे श्री.खंडेराव राजेंद्र पाटील व श्री. राहुल राजेंद्र पाटील धनेगाव यांच्या मदनी नगर,लातूर येथील श्री रोकडेश्वर किराणा व जनरल स्टोअर्स शाखा २ व गोडाऊन चे उद्घाटन ॲड.प्रवीण हणमंतराव पाटील अध्यक्ष,लातूर जिल्हा कॉँग्रेस (विधी विभाग) यांच्या हस्ते संपन्न झाले.अत्यंत प्रतिकुल परिस्थितीतून या दोघांनी व माझे बंधुराज श्री.राजेन्द्र ज्ञानोबा पाटील यांनी कष्ट, जिद्द व अविरत मेहनतीच्या बळावर मिळवलेले यश हे सर्व धनेगावकरांसाठी अभिमानास्पद बाब आहे व नवऊद्योजकांसाठी निश्चितच प्रेरणादायी आहे.यांचा हा व्यवसाय असाच वृद्धिंगत होवो हि श्री रोकडेश्वर चरणी प्रार्थना.**

# यशवंत विद्यालयाचे लिपिक बालाजी माळी यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा उत्साहात साजरा

## शिक्षकांनी सेवानिवृत्तीच्या काळात सामाजिक कामात अग्रेसर रहावे-शिक्षण महर्षी डी.बी. लोहारे गुरुजी यांचे प्रतिपादन



अहमदपूर / प्रतिनिधी- भारतीय संस्कृतीमध्ये गेल्या अनेक पिढ्यापासून समाजामध्ये शिक्षकांना अत्यंत मानसन्मान दिला जातो त्यामुळे शिक्षकांनी सेवानिवृत्तीचा काळ सामाजिक कार्यात झोकून देऊन कार्य करावे असे आग्रही प्रतिपादन टागोर शिक्षण समितीचे सचिव शिक्षण महर्षी, दलित मित्र डी.बी. लोहारे गुरुजी यांनी केले.

ते यशवंत विद्यालया चे लिपिक बालाजी माळी यांच्या २६ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर त्यांना शाळेच्या वतीने त्यांचा शाल, श्रीफळ, पुष्पहार व भर आहेर देऊन सेवा गौरव कृती सोहळ्यात अध्यक्ष स्थानावरून दि. ३१ रोजी हॉटेल यश टू येथे आयोजित कार्यक्रमात बोलत होते .

यावेळी व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून शांतिनिकेतन पतसंस्थेच्या माजी चेअरमन पुष्पाताई लोहारे, संस्थेच्या सहसचिव डॉ. सुनिता ताई चवळे, प्राचार्य गजानन शिंदे, सत्कारमूर्ती बालाजी माळी, सौ अश्विनी माळी यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती.

यावेळी सेवानिवृत्त बद्दल शाळेच्या वतीने बालाजी माळी,सौ.आश्विनी माळी यांचा शाल, श्रीफळ आणि भर आहेर देऊन शिक्षण महर्षी डी बी लोहारे गुरुजी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी यावेळी प्रा.दासराव कोरे ,गहीनीनाथ क्षिरसागर, डॉक्टर सुनिता ताई चवळे यांचे मनोगत पर भाषणे झाली. सत्कारमूर्ती यांचे मनोगत पर भाषण झाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पर्यवेक्षक राम तत्तापुरे यांनी केले. सूत्रसंचालन कपिल बिराजदार यांनी तर आभार राजकुमार पाटील यांनी मांनले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी यशवंत विद्यालयाच्या शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## दिवा स्थानकात रेल्वेचा दरवाजा फोडण्याचा प्रयत्न

मुंबई १ - मध्य रेल्वेच्या ६३ तासांच्या मेगाब्लॉकला अद्यापही काही तास उरले आहेत. अद्यापही मेगाब्लॉक पूर्ण झाला नसला तरीही प्रवाशांची संख्या मात्र कमी होत नसल्यामुळं वाहतुकीच्या इतर साधनांवर याचा ताण येताना दिसत आहे. काही प्रवाशांना अपेक्षित स्थळी पोहोचण्यासाठी रेल्वेव्यतिरिक्त इतर पर्याय नसल्यामुळं खोळंबा अपेक्षित असतानाही अनेकांनी रेल्वे स्थानकाची वाट धरली. काहींना या ब्लॉकची कल्पना नसल्यामुळं अशा प्रवाशांचाही या परिस्थितीमुळं खोळंबा होताना दिसत आहे. मध्य रेल्वेच्या या ब्लॉकमुळं सध्या ठाणे आणि त्यापुढील स्थानकांवर प्रचंड गोंधळाची स्थिती पाहायला मिळत आहे. शनिवारी सकाळच्याच वेळी दिवा स्थानकाच तुडूंब गर्दी पाहायला मिळाली. दिवा स्थानकातून मुंबईच्या दिशेनं जाणाऱ्या लोकलमध्ये ही गर्दी पाहायला मिळाली. इथं गर्दी असल्यामुळं रेल्वेचा दरवाजा बंद करण्यात आला होता, पण प्रवाशांनी हा दरवाजा तोडण्याचा प्रयत्न केला आणि तिथं एकच आरडाओरडा झाला.

# शिरूर ताजबंद एसटी महामंडळाचा ७६ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा

अहमदपूर / प्रतिनिधी- शिरूर ताजबंद चौरस्तावरील असलेले बस स्थानकात एसटी महामंडळाचा ७६ वा वर्धापन दिन शनिवार ता.१ साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त वाहक दाऊद शेख हे होते. तर प्रमुख म्हणून वाहतूक नियंत्रक धीरज ठाकूर, प्रल्हाद सिंगरवाड, लक्ष्मण येचाळे ,बालाजी गायकवाड व शशिकांत गायकवाड आदी उपस्थित होते.

यावेळी बस स्थानकावर प्रवास करणाऱ्या लहान बाळाच्या हस्ते केक कापून उद्घाटन करण्यात आले.

एसटी साठी हे काळ स्वर्ण काळ होता कारण त्याकाळी एसटी शिवाय प्रवासाचे दुसरे साधन नव्हते पण कालांतराने खाजगी वाहतूक रस्त्यावर आल्याने एसटीचे बुरे दिन यायला सुरुवात झाली. परंतु गेल्या वर्षभरात पहिल्यांदा एसटीची उत्पन्नाची टक्केवारी उच्चांकी पातळीवर गेली आहे सरकारने महिलांना अर्धे तिकीट दरात दिलेला प्रवास व अमृत महोत्सवी जेष्ठ नागरिकांना मोफत प्रवास जाहीर केल्याने प्रवासी संख्या कमालीची वाढली आहे सहाजिकच त्यामुळे उच्चांकी एसटी महामंडळाला मंडळाला उत्पादन मिळत आहे असेही श्री शेख म्हणाले. यावेळी प्रवाशांचे पुष्पगुच्छ व पेढे देऊन स्वागत करण्यात आले व एसटीला भविष्यकाळात हे चांगले दिवस असे शुभेच्छा देण्यात आल्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व्ही एस वाघमारे यांनी केले तर आभार संजय सिंगरवाड यांनी मानले.



फोटोओळ- शिरूर ताजबंद येथे बस स्थानकात ७६ व्या वर्धापनादिनानिमित्त लहान बालकाच्या हस्ते केक कापताना मंदाकिनी ढवळे धीरज ठाकूर व प्रल्हाद सिंगरवाड, पूर्ण श्रीमंगले.

# थोडा अंधार हवा आहे

हल्ली सगळ्यात मोठा प्रॉब्लेम कुठला असेल तर तो म्हणजे कधीश्र अंधारच होत नाही. सगळीकडे इन्व्हर्टर असतात आणि अगदीच नसले तरी लोकं दुसऱ्या सेकंदाला मोबाईलचा लाईट लावतात आणि अंधार घालवतात. त्यामुळे दुसऱ्या क्षणी तुम्हाला तुमच्या पुढचं , आजूबाजूचं दिसू लागत. पण तिथेच खरा प्रॉब्लेम आहे.

मला आठवतं आहे , आमच्या लहानपणी इन्व्हर्टर , मोबाईल नव्हते. मेणबत्त्या , कंदील हे ऑपशन्स होते. पण कधी रात्री लाईट गेले तर दुसऱ्या सेकंदाला आजीचा आवाज यायचा. कोणीही जागचे हलू नका. आहे त्या जागेवर बसून आपापले डोळे २ मिनिटे घट्ट बंद करा आणि आम्ही डोळे घट्ट मिटायचो. मग २ मिनिटांनी आजीचा आवाज यायचा ..आता हळूहळू डोळे उघडा आणि आपोआप अंधारात दिसू लागेल. आणि खरंच मगास पेक्षा आता थोडं दिसू लागलं असायचं. मला अजूनही याचं अप्रूप आहे. मुळात अंधारात असताना डोळे का मिटायचे, त्याने काय होणार पण डोळे मिटून उघडले की दिसू लागायचं हे खरं. मला वाटतं की जुन्या पिढीला हीच सवय होती कि अंधारात असलो की अजून घट्ट डोळे मिटून आत डोकावायचे. स्वतःचे डोह धुंडाळायचे. आपल्या जाणिवा , नेणिवाचे झरे मोकळे करायचे आणि मग वाटा स्पष्ट होत असाव्यात / दिसत असाव्यात. आणि आपणच शोधलेली आपली वाट असेल तर मग ती सुकर होते, त्याचं ओझं होत नाही आणि त्या वाटेवरचा प्रवास समाधान देणारा असतो. माझ्या आजोबांचा पण लाईट गेले की एक आवडता डायलॉग होता. अंधारात रस्ता दिसतो आणि उजेडात फक्त खड्डे दिसतात..दिवे येई पर्यंत तुमचे रस्ते शोधा.. लहानपणी मला हा विनोद वाटायचा पण हल्ली आजोबा आठवतात , त्यांचं वाक्य आठवतं आणि आता कुठे त्याचा अर्थ ६० वर्षांनी थोडाफार कळतो. स्वतःच्या तरुणपणी परिस्थितीच्या अंधारात त्यांनी कष्ट सोसले, वार लावून जेवले , शिकले , नोकरी केली, आपला रस्ता शोधला . स्वतःच्या पोटाला चिमटा काढून मुलांना इंजिनिअर केलं, त्याची फळं आम्ही उपभोगतोय. कधी नव्हे तर परवा खूप वेळ लाईट गेले , इन्व्हर्टर बंद पडला तर किती चिडचिड. डेटाचा स्पीड थोडा कमी झाला आणि लॅग आला तर त्रागा. पिझ्झा अर्ध्यातासात डिलिव्हर नाही झाला तर फ्री ची मागणी. उजेडात फक्त खड्डे दिसतात हेच खरं. पण हल्ली अंधारच होत नाही. मुळात अंधारच माहित नाही. आजूबाजूला सारखा लाईट असतो पण तो एनलायटन करू शकत नाही आणि डोळेच कधी न मिटल्यामुळे आत डोकावायची वेळच येत नाही. इन्व्हर्टर / मोबाईल च्या लाईट ने आजूबाजूचं दिसतं आणि फक्त आजूबाजूचं दिसलं तर फक्त स्पर्धा वाढते, पण वाट काही सापडत नाही. वाट सापडायची असेल तर आत डोकावता आलं पाहिजे. आपापले डोह धुंडाळता आले पाहिजेत. अंधारात तळाशी पोहोचणं सोपं होतं असावं. म्हणून अधून मधून थोडा मिट्ट अंधार हवा आहे.

# अभ्यासक्रमामध्ये मनुस्मृती ऐवजी मूलभूत हक्क व कर्तव्यांचा समावेश करण्यात यावा

धाराशिव दि.१ (प्रतिनिधी) - इयत्ता तिसरी ते बारावीच्या शालेय अभ्यासक्रमामध्ये भगवद्ग गीता, मनाचे श्र्लोक आणि मनुस्मृती याचा समावेश करण्याऐवजी भारतीय नागरिकांच्या मूलभूत हक्कांचा आणि कर्तव्यांचा समावेश करण्यात यावा, अशी मागणी करीत हरकत भारतीय बौद्ध महासभेच्यावतीने जिल्हाधिकाऱ्यांमार्फत राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे यांच्याकडे एका निवेदनाद्वारे नोंदविली आहे. दरम्यान याबाबत हरकती नोंदविण्यासाठी दि.२५ जूनपर्यंत मुदतवाढ देण्यात यावी अशी मागणी केली आहे.



दिलेल्या निवेदनात असे नमूद करण्यात आले आहे की, शालेय अभ्यासक्रमामध्ये भगवद्ग गीता, मनाचे श्र्लोक आणि मनुस्मृती याचा समावेश करणे हे भारतीय संविधानाच्या मूलभूत अधिकार १३, १४, १७, १९, २१, २८ नुसार चुकीचे आहे. तसेच ही बाब धर्म निरपेक्ष असलेल्या भारतातील सर्व नागरिकांस समान असलेल्या समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि नैसर्गिक न्यायाच्या संकल्पनेला काळीमा फसणारी आहे. तसेच सर्जनशील भारताची निर्मिती करणाऱ्या शिक्षण प्रणालीमध्ये अशा प्रकारच्या समता मुलक समाज निर्मितीच्या तत्त्वाला मूठमाती देणाऱ्या विषमतावादाचा पुरस्कार, समर्थन करणाऱ्या अभ्यासक्रमाचा शालेय शिक्षणात समावेश करून आपण भारतीय नागरिकांमध्ये भय आणि मानवी विषमता निर्माण होण्यास खतपाणी घालण्याचा प्रकार आहे. विशेष म्हणजे धर्म निरपेक्ष संविधानाने देशातील सर्व जाती धर्मांना संरक्षित करीत कलम २८ प्रमाणे सांगितले आहे की, कलम २८ (१) नुसार,पूर्णतः राज्याच्या निधीतून चालविल्या जाणाऱ्या कोणत्याही शैक्षणिक संस्थेत कोणतेही धार्मिक शिक्षण दिले जाणार नाही. तसेच कलम १३ (१) नुसार या संविधानाच्या प्रारंभाच्या निकटपूर्वी भारताच्या राज्य क्षेत्रात अमलात असलेले सर्व कायदे ते जेथवर या भागाच्या उपबंधाची विसंगत असतील तेथवर ते अशा विसंगतीच्या व्याप्ती पुरते शून्य असतील. (क) विधी, कायदा यात भारताच्या राज्यक्षेत्रात कायदा इतकाच प्रभावी असलेला कोणताही अध्यादेश, आदेश, उपविधी, नियम, अधिसूचना, रूढी किंवा परिपाठ यांचा समावेश आहे असे भारतीय संविधानाशी विसंगत कोणतेही कायदे शून्य ठरविले आहेत. असे असताना उपरोक्त बाबी शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट करण्याचा विचार करणे म्हणजे आपण देशातील युवा वर्गाला अधोगतीच्या दिशेने घेऊन जाणारे हे लक्षात घेतले पाहिजे. त्यामुळे शालेय अभ्यासक्रमात महत्त्वपूर्ण अभ्यासक्रम समावेश करावयाचा असेल तर आपण निश्र्चितपणे भारतीय संविधानाची प्रस्ताविका, अनुछेद १ ते ३२ पर्यंतचे मूलभूत अधिकार आणि भारतीय नागरिकांची मूलभूत कर्तव्य यांच्यासह लोकसेवा आयोग आणि भारतीयांच्या नोकऱ्यांच्या तरतुदींचा शालेय अभ्यासक्रमात वर्ग क्रमाक्रमानुसार समावेश करावा. त्यामुळे भारतीय नागरिक आपल्या हक्क आणि अधिकारासंबंधी आणि कर्तव्या संबंधित जागृत होईल. जर सामाजिक विषमतेचा पुरस्कार करणाऱ्या मनाचे श्र्लोक, भगवद्ग गीता व मनुस्मृतीचा शालेय अभ्यासक्रमात समावेश करु नये. अन्यथा महाराष्ट्रभरामध्ये तीव्र आंदोलन छेढण्यात येईल असा इशारा दिला आहे. यावर भारतीय बौद्ध महासभेच्या जिल्हाध्यक्ष विजयमाला धावारे, केंद्रीय शिक्षक गुणवंत सोनवणे, तालुकाध्यक्ष बाबासाहेब बनसोडे, जि. संघटक विजय बनसोडे, ता,सरचिटणीस उमाजी गायकवाड, सरचिटणीस आदिनाथ सरवदे, जि.महिला उपाध्यक्ष शीलाताई चंदनशिवे, बाबासाहेब कांबळे, सचिव महादेव एडके, उपाध्यक्ष अंजनाताई गजधने, कल्याणी गजधने, समता सैनिक दलाचे प्रतीक चंदनशिवे यांच्या सह्या आहेत.

# चिकनमुळे रोग प्रतिकारक शक्ती कमकुवत होतेय!

नवी दिल्ली : तुम्ही विकत घेऊन जे चिकन खात आहात ते आरोग्यासाठी किती फायद्याचे आहे हे तुम्हाला माहित आहे का. सेंटर फॉर सायन्स अँड एन्व्हायर्नमेंट (सीएई) च्या प्रयोगशाळेतील संशोधनात असेही आढळून आले आहे की चिकनमध्ये ४० टक्के प्रतिजैविकांचे अवशेष असतात. चिकनमध्ये प्रथिने, जीवनसत्त्वे आणि खनिजे असतात. असे मानले जातात. परंतु अलीकडील काही संशोधनात असेही समोर आले आहे की जे लोक हे सेवन करतात त्यांची प्रतिकारशक्ती कमी होऊ शकते आणि त्यांच्यावर अँटीबायोटिक्सचा प्रभाव खूपच कमी होऊ शकतो.

कोंबड्यांना वेगवेगळ्या रोगांपासून वाचवण्यासाठी किंवा त्यांना लवकर मोठे करण्यासाठी तसेच त्यांचे वजन वाढवण्यासाठी त्यांना अँटीबायोटिक दिले जाते. त्यामुळे जर तुम्ही ते चिकन खाल्ले तर तुमच्या शरीरावर त्याचे विपरीत परिणाम होऊ शकतात. कारण चिकनमधील अँटिबायोटिक्स तुमच्या शरीरात जातात. त्यानंतर त्याची आपल्या शरीराला सवय होते. पण जेव्हा एखादी व्यक्ती आजारी पडते, तेव्हा त्याच्यावर अँटीबायोटिक्स लवकर काम करत नाहीत, त्यासाठी मग त्यांना जास्त डोस दिले जातात. जे शरीरासाठी हानिकारक असू शकतात.

शरीरावर अँटीबायोटीक्सचा भडीमार जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालात देखील असा दावाही करण्यात आला आहे की, जगभरात कोविड-१९ महामारीच्या काळात देखील अँटिबायोटिक्सच्या अंदाधुंद वापर करण्यात आला. पण अनेकांवर तर आता अँटीबायोटीकचाच परिणामच होताना दिसत नाही. डब्ल्यूएचओच्या अहवालात देखील असे आढळून आले की सुमारे ७५ टक्के रुग्णांवर अँटीबायोटिक्सने उपचार केले जातात. पण जेव्हा ते काम करत नाही तेव्हा त्याची अधिक डोस द्यावा लागतो.

पान १ वरून

## डोनाल्ड ट्रम्प...

राष्ट्राध्यक्ष आहेत.

२०१६ च्या अध्यक्षीय निवडणुकीत पॉर्न स्टार स्टॉर्मी डॅनियल्सने तोंड बंद ठेवावे, यासाठी ट्रम्प यांनी १ लाख ३० हजार डॉलर (हश मनी) दिले होते. हे लपविण्यासाठी त्यांनी व्यावसायिक नोंदीत हेराफेरी केल्याचे न्याय मंडळाने एकमताने मान्य केले. न्यायालयाचा हा निकाल कायदेशीरदृष्ट्या ट्रम्प यांना पुन्हा अध्यक्षपदी निवडून येण्यापासून रोखत नसला, तरी या निकालाचे महत्त्व ५ नोव्हेंबरला मतदार याबाबत काय निर्णय घेतात, यावर अवलंबून आहे.

लज्जास्पद प्रकार

जेव्हा निकाल ऐकवला गेला, तेव्हा ट्रम्प शांत, निश्र्चल राहिले. न्यायालयाबाहेर पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी हा निर्णय सदोष असल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली. हे लज्जास्पद आहे. एका वादग्रस्त न्यायाधीशाद्वारे केलेली ही सदोष आणि भ्रष्ट सुनावणी होती. जनता ५ नोव्हेंबरला खरा निकाल देईल. इथे काय झाले ते त्यांना माहीत आहे. मी पूर्णपणे निर्दोष आहे. मी माझ्या देशासाठी लढत आहे. मी आपल्या संविधानासाठी लढत आहे, असे डोनाल्ड ट्रम्प यावेळी म्हणाले.

काय आहे प्रकरण?

स्टॉर्मी डॅनियल्सने तिच्यासोबतच्या आपल्या कथित लैंगिक संबंधाची वाच्यता करू नये, म्हणून २०१६ च्या अध्यक्षीय निवडणुकीपूर्वी ट्रम्प यांनी तिला १ लाख ३० हजार डॉलर दिले होते. हा व्यवहार उघडकीस येऊ नये, म्हणून ट्रम्प यांनी व्यावसायिक नोंदीत फेरफार केल्याचा आरोप आहे. हे प्रकरण २०१८ मध्ये उघडकीस आल्यानंतर ट्रम्प यांनी डॅनियलसोबतच्या लैंगिक संबंधाचे आरोप फेटाळत हे कुंभाड असल्याचा दावा केला होता.

## महाविकास आघाडीत...

ठाकरेंसोबत राहिले. यंदा उद्धव ठाकरेंचे ९ खासदार निवडून येतील असा अंदाज वर्तवण्यात येत आहे. म्हणजे गेल्या वेळच्या तुलनेत उद्धव ठाकरेंना ९ जागांचा तोटा होणार असं सांगितलं जातंय.

गतवेळच्या तुलनेत यंदा काँग्रेसला सात जागांचा अधिकचा फायदा होणार असल्याचं चित्र आहे. गेल्या निवडणुकीमध्ये काँग्रेसचा एकच खासदार निवडून आला होता. त्या तुलनेत यंदा ८ खासदार निवडून येतील असं सी व्होटरचा सर्व्हे सांगतोय. त्यामुळे यंदा काँग्रेसला सात खासदारांचा फायदा होतोय असं दिसतंय.

भाजपला ६ जागांचा तोटा

२०१९ सालच्या निवडणुकीमध्ये भाजपच्या २३ जागा निवडून आल्या होत्या. त्यांना आता सहा जागांचा तोटा होणार असल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. भाजपने २८ जागा लढवल्या असून त्यांना १७ जागा मिळणार असल्याचा अंदाज सांगतोय.

## हवाई प्रवास...

लाखाच्या वर आल्याचे आयओसीएलने म्हटले आहे .

आंतरराष्ट्रीय उड्डाण स्वस्त होणार

आंतरराष्ट्रीय मार्गांसाठीही जेट इंधनाच्या किमतीत कपात करण्यात आली आहे. देशातील चारही महानगरांमध्ये आंतरराष्ट्रीय उड्डाणांसाठी जेट इंधन प्रति किलोलिटर ५१.१ डॉलरने स्वस्त झाले आहे.

## ग्राहकांना...

दर १७८७ रुपये झाला आहे. तर चेन्नईत व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या दरात ७०.५ रुपयांनी घट होऊन सिलिंडरचे दर १८४०.५० रुपयांनी उतरले आहेत.

घरघुती ग्राहकांच्या हाती निराशा

गेल्या तीन महिन्यांपासून व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या दरात घट होत आहे. मात्र या काळात घरगुती गॅस सिलिंडरच्या दरात कोणतीही घट झालेली नाही. त्यामुळे घरघुती ग्राहकांच्या हाती निराशा आली आहे.

## पीओके...

पीओकेत सध्या पाकिस्तानबाबत रोष आहे. कवी अहमद फरहाद हे विद्रोही शायर म्हणून लोकप्रिय आहेत. पाकिस्तानी लष्कर, पोलिसांवर हल्ला झाल्यानंतर त्यांच्या घरातून त्यांचे अपहरण करण्यात आले. बुधवारी ॲटर्नी जनरल मन्सूर उस्मान अवान यांनी फरहाद यांना अटक करण्यात आली आणि ते सध्या पीओके पोलिसांच्या ताब्यात असल्याचे म्हणणे इस्लामाबाद हायकोर्टासमोर सादर केले.

## ईशान्य...

जणांचा मृत्यू झाला. जोरदार वा-यामुळे तात्पुरते उभारलेले शेड अंगावर पडून शहाजहानपूरमध्ये तिघांना प्राण गमवावे लागले. इतर दोघांचा उष्माघाताने मृत्यू झाला.

गंगोत्री महामार्गावर दरड कोसळली

उत्तराखंडमधील उत्तरकाशी-गंगोत्री महामार्गावर डबरानीत दरड कोसळल्याने काहीजण दबले गेल्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. या दुर्घटनेत आतापर्यंत एकाचा मृत्यू झाला आहे. इतर पाचजण गंभीर जखमी झाले. मदत व बचाव पथकाकडून बचावकार्य राबविले जात आहे. वाहतूक ठप्प झाल्याने ५०० वाहने अडकली आहेत.

नदी - पाणीपातळी - धोक्याच्या पातळीपेक्षा अधिक ब्रह्मपुत्रा - ८५.२५ मी. - ०.२९ मीटर बराक - ३०.१५ मी. - ३.९५ मी. कोपिली - ६२.०८ मी. - १.५८ मी. कुशियारा - १६.५ मी. - १.५६ मी.

## सरकारी...

टिप्पणी केली. सर्वोच्च न्यायालयाच्या या निकालामुळे सरकारी विभागातील पदोन्नतीशी संबंधित अनेक विषयात स्पष्टता मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. अनेक ठिकाणी पदोन्नतीच्या विषयावरून सरकारी कर्मचारी न्यायालयात जात असतात. निकालाचे लिखाण करत असताना न्या. पारडीवाला यांनी म्हटले की, अनेक ठिकाणी वर्षानुवर्ष नोकरी करणारे कर्मचारी संस्थेप्रती असलेल्या आपल्या निष्ठेचे फळ मिळण्याची वाट बघत असतात. सर्वोच्च न्यायालयाने पदोन्नतीच्या विषयात वेळोवेळी हेच सांगितले आहे की, पदोन्नतीसाठी सेवाज्येष्ठतेसह काम ाचा दर्जाही पाहिला पाहीजे. पदोन्नती संदर्भात याआधीही अनेक प्रकरणात सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झालेली आहे. पदोन्नतीमध्ये आरक्षण मिळण्याबाबतचे प्रकरणही सर्वोच्च न्यायालयात पोहोचले होते. पदोन्नतीमध्ये आरक्षण देण्यास राज्ये बांधील नाहीत आणि पदोन्नतीमध्ये आरक्षणाचा दावा करण्याचा कोणताही मूलभूत अधिकार नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले होते.

# सावित्रीबाई माध्यमिक विद्यालयाची यशाची परंपरा कायम दिपाली मुडे प्रथम तर जिया वाघमारे द्वितीय

देगलुर(प्रतिनिधी): शहरातील सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालयाने शालांत परीक्षेत यावर्षीही यशाची परंपरा कायम ठेवली आहे.

सदरिल विद्यालयात सेमी व मराठी असे दोन वर्ग चालतात. शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये दोन्ही वर्गातुन एकूण ७४ विद्यार्थी परिक्षेस बसलेले होते. त्यापैकी ६८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. यामध्ये विशेष प्राविण्य मिळवणारे २१ विद्यार्थी तर प्रथम





श्रेणीतील २७ आणि व्दितीय श्रेणीमध्ये १७ विद्यार्थी व पास विद्यार्थी ०३ यशस्वी झाले.या यशाबद्दल लोकहित शिक्षण संस्थेचे,अध्यक्ष राजाराम कहाळेकर ,संस्थेचे सचिव अँड. जयवंत गजभारे , माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक यशवंत गजभारे , प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक किशन पाटील तसेच शाळेतील सर्व शिक्षक,शिक्षिका व शिक्षेकेत्तर कर्मचाऱ्यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे तसेच दहावीच्या श्रीमती काळे एस.बी. व पवार व्ही.पी या दोन वर्गाच्या वर्ग शिक्षक तसेच सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले त्याबद्दल संस्थेकडून अभिनंदन करण्यात आले.

# चाकूर येथील बालाजी राम मंदिरातील सीतामाईच्या मंगळसुत्राची चोरी,भाविकांत भितीचे वातावरण

चाकूर प्रतिनिधी- चाकूर शहरातील प्रसिद्ध असलेल्या श्री. बालाजी राम मंदिरात अज्ञात चोरट्यांनी चोरी केल्याने भाविकांमध्ये तिव्र संताप व्यक्त केला जात आहे.गोविंद रामकरण लोया यांच्या तक्रारी वरून चाकूर पोलीसांत अज्ञात व्यक्तींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.चाकूर पोलिस स्टेशन पासून एक किलोमीटरच्या आत असलेल्या मंदिरात चोरी झाली आहे.चोराला पकडण्याचे चाकूर पोलिसांसमोर आव्हान आहे.तात्काळ तपास करून चोरट्यांना पकडून योग्य ती कार्यवाही करावी अशी नागरीकांतून मागणी होत आहे.

चाकूर शहरात प्रसिद्ध असलेले श्री. बालाजी राम मंदिर येथील सीतामाईच्या गळ्यातील सहा ग्रामचे मंगळसूत्र दि.३० में रोजी संध्याकाळी अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याने नागरीकामध्ये तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे.शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या



मंदिरात चोरी झाल्याने नागरीकामध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. पोलिसांनी दिलेली माहिती अशी की,३० में रोजी सायंकाळी साडेपाच वाजायच्या सुमारास आझाद चौकातील श्री बालाजी राम मंदिराचे पुजारी अरविंद जोशी यांनी श्री बालाजी राम मंदिरात चोरी झाल्याची माहिती फोन वरून गोविंद लोया यांना दिली. त्यानंतर गोविंद लोया,ओमप्रकाश लोया,अभय सुवर्णकार,अशोक शेळके आदींनी माहिती मिळताच तात्काळ मंदिरात जाऊन पाहणी केली असता श्री बालाजी राम मंदिरातील गाभाऱ्याचे दार उघडे होते.त्यानंतर मंदिरातील श्री राम,लक्ष्मण व सितामाईचे संगममरमरीच्या मुर्तीजवळ गेले असता असे लक्षात आले की, सीतामाईच्या गळ्यातील सहा ग्राम सोन्याचे मनी मंगळसूत्र ज्याची किंमत १९,२०० रूपयांची कोणीतरी अज्ञात चोरट्यांनी चोरी केली आहे.यानंतर गोविंद लोया यांच्या तक्रारी वरून भारतीय दंड संहिता १८६० च्या कलम ३७९ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.यानंतर चाकूर पोलिसांनी घटनास्थळी भेट दिली असून पुढील तपास पोलीस निरीक्षक दत्तात्रेय निकम यांच्या नेतृत्वाखाली योगेश मारापल्ले व चाकूर पोलीस करीत आहेत.

## कुलदीप लाखेची एम. टेकसाठी हैद्राबाद आयआयटीमध्ये निवड



धाराशिव दि.१ (प्रतिनिधी) – वाशी तालुक्यातील लाखनगाव येथील कुलदीप कुमार लाखे या विद्यार्थ्याची एम.टेक. साठी निवड झाली आहे.

पीजीईई परिक्षा उत्तीर्ण झाल्यामुळे लाखे याला हैद्राबाद येथील इंटरनॅशनल इन्स्टीट्युट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी कॉलेजमध्ये कॉम्प्यूटर सायन्स व इंटेलीजन्स सिक्युरिटी या विषयासाठी प्रवेश मिळाला आहे. त्याचे बारावीपर्यंतचे शिक्षण कोल्हापूर जिल्ह्यातील अतिग्रे येथील संजय घोडावत आयआयटी अँड मेडीकल अकॅडममध्ये तर बी.टेक.चे पुणे येथील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग येथे झाले आहे. त्याच्या निवडीबद्दल खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर व आमदार कैलास पाटील यांनी अभिनंदन केले असून त्याचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# गरजू विद्यार्थ्यांसाठी अडीच लाखांहून अधिक वह्या उपलब्ध

## वाढदिवसानिमित्त हारतुऱ्याऐवजी नागरिकांनी दिल्या वह्या

## आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्या आवाहनास प्रतिसाद

धाराशिव दि.१ (प्रतिनिधी) – सध्याच्या दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर गरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला पाठबळ मिळावे यासाठी लोकनेते डॉ.पद्मसिंह पाटील यांच्या वाढदिवसाला पुष्पहार, पुष्पगुच्छ या ऐवजी वह्यांच्या स्वरुपात शुभेच्छा द्याव्यात, असे आवाहन आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी केले होते. त्याला प्रतिसाद देत दि. १ जून रोजी जिल्हाभरातील कार्यकर्त्यांनी अडीच लाखाहून अधिक किंमतीच्या वह्या देवून डॉ पद्मसिंहजी पाटील यांचा वाढदिवस साजरा केला.

यंदा अत्यल्प पाऊस झाल्याने जिल्ह्यात दुष्काळी परिस्थिती उद्भवली आहे. त्यामुळे डॉक्टर साहेबांचा वाढदिवस हारतुरे देवून साजरा करण्याऐवजी गरजू विद्यार्थ्यांना वह्या वाटप करण्यासाठी पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी वह्या आणाव्यात, असे आवाहन आ राणाजगजितसिंह पाटील केले होते. त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत जिल्ह्यातील असंख्य नागरिक, नेते, पदाधिकारी, लोकप्रतिनिधी व कार्यकर्त्यांनी अडीच लाखाहून अधिक रूपयांच्या वह्या देवून वाढदिवस साजरा केला.

दिवसभरात जमा झालेल्या वह्या जिल्हा परिषद आणि नगर पालिकेच्या शाळातील गरजू विद्यार्थ्यांना नियोजनबद्धरित्या वाटप करण्यात येणार आहेत.

**जन्मदिवसाच्या निमित्ताने हार, तुरे टाळून शालेय विद्यार्थ्यांना मदत करण्यासाठी वह्या देण्याचे आवाहन करण्यात आले होते. जिल्ह्यातील नागरिक, कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांनी त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे. काही कार्यकर्त्यांनी आदराने हार, तुरे आणि शाल देऊन शुभेच्छा दिल्या आहेत. आगामी काळात त्यालाही छेद देऊन सर्वांनीच मोठ्या प्रमाणात वह्यांचे संकलन करावे व गरजू विद्यार्थ्यांना मदत करावी असे आवाहन डॉ.पद्मसिंह पाटील यांनी केले आहे.**



समाजासमोर एखादा चांगला विचार आपण मांडला तर समाजही या विचाराला भरभरून प्रतिसाद देतो, हा सुखद अनुभव यानिमित्ताने आला. अलीकडच्या काळात वाढदिवसाला आलेले वेगवेगळे स्वरूप पाहता डॉ पदमसिंह पाटील यांच्या वाढदिवसाला एक वेगळा पायंडा पडला असल्याचे आ.पाटील यांनी सांगितले.

## अहिल्यामाई होळकर यांचा इतिहास प्रत्येक घरापर्यंत पोहोचला पाहिजे - अहंकारी



नळदुर्ग दि.१ (प्रतिनिधी) – काश्मिर ते कन्याकुमारीपर्यंत अनेक हिंदू मंदिरांचा जीर्णोद्धार करणाऱ्या तसेच तळागाळातील समाजाच्या कल्याणासाठी कार्य करणाऱ्या लोकमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा इतिहास प्रत्येक घरापर्यंत पोहोचला पाहिजे तरच खऱ्या अर्थाने आजच्या पिढीला अहिल्यादेवींचा इतिहास समजणार असल्याचे प्रतिपादन माजी नगरसेवक विनायक अहंकारी यांनी दि.३१ मे रोजी केले.

नळदुर्ग येथे राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर मध्यवर्ती जन्मोत्सव समितीच्यावतीने राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची २९९ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. त्यावेळी ते बोलत होते. अहिल्यामाई होळकर यांच्या प्रतिमेस बलदेवसिंग ठाकूर, सोसायटीचे संचालक रघुनाथ नागणे, मनसेचे शहर सरचिटणीस प्रमोद कुलकर्णी व भगवंत सुरवसे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमा मध्यवर्ती जन्मोत्सव समितीचे सल्लागार ज्ञानेश्वर घोडके ज्ञानेश्वर घोडके, सुहास येडगे, पत्रकार दादासाहेब बनसोडे, प्रभाकर घोडके, विलास येडगे, दीपक घोडके, एकनाथ शिरगुरे, सुनिल गव्हाणे, उत्तम बनजगोळे, बंडप्पा कसेकर, रवी ठाकूर, राजेंद्र ठाकूर आदी उपस्थित होते. पुढे बोलताना अहंकारी म्हणाले की, अहिल्यामाईंचे कार्य महान असून भारताच्या इतिहासात त्यांचे कार्य सुवर्ण अक्षरांनी लिहिण्यासारखे आहे. तसेच त्यांनी समाजातील सर्व घटकांसाठी काम केल्यामुळेच त्यांना राजमाता, लोकमाता म्हणून गौरविले जाते असेही त्यांनी आवर्जून नमूद केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार ज्ञानेश्वर घोडके यांनी मानले.

यावेळी नळदुर्ग बसस्थानकात भिमाशंकर बताले यांनी तसेच

## निळकंठेश्वर पशुधन व्यवस्थापक व दुग्धोत्पादक पदविका विद्यालयात दूध दिन साजरा




धाराशिव दि.१ (प्रतिनिधी) – तालुक्यातील शिंगोली येथील निळकंठेश्वर पशुधन व्यवस्थापक व दुग्धोत्पादक पदविका विद्यालयात १ जून हा जागतिक दूध दिन व दूध जागृती अभियान रौप्य महोत्सव दि.१ जून रोजी साजरा करण्यात आला.

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ नागपूर अंतर्गत पशुवैद्यकीय महाविद्यालय उदगीर संलग्नित असलेल्या पदविका विद्यालयात आयोजित कार्यक्रमास नागपूर येथील निम्न शिक्षण मपविविचे सहयोगी अधिष्ठाता डॉ.अनिल भीकाणे, डॉ.नंदकुमार गायकवाड, उदगीर येथील पवैमचे समन्वयक डॉ. अनिल पाटील यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अध्यापक महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य ऋषिकेश लोमटे हे होते. यावेळी बोलताना लोमटे यांनी दूध सेवनाचे फायदे व दुधाचे गुणधर्म सांगून दूध प्या व दीर्घायु व्हा असा संदेश त्यांनी दिला.


या कार्यक्रमासाठी निळकंठेश्वर पशुधन व्यवस्थापक व दुग्धोत्पादन पदविका विद्यालयातील सर्व विद्यार्थी उपस्थित होते. तसेच डॉ. वेदप्रकाश पाटील शैक्षणिक संकुलातील डी.व बी.फार्मसीचे प्राचार्य डॉ.सुरज ननवरे, आर.पी.कॉलेज ऑफ बी.फार्मसीचे प्राचार्य डॉ. गाजी शेख, बी.एस्सी. ॲग्रीचे प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील, व्यवस्थापक प्रा.हरि घाडगे, निळकंठेश्वर पशुधन व्यवस्थापक व दुग्धोत्पादन पदविका विद्यालयाचे प्राचार्य दळवे, व्याख्याता गादेकर, शिंदे, बनसोडे आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व उपस्थितांचे आभार बालाजी वाघमारे यांनी मानले.

## डॉ. पद्मसिंह पाटील यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा



धाराशिव दि.१ (प्रतिनिधी) – माजी मंत्री डॉ पद्मसिंह बाजीराव पाटील यांच्या जन्मदिवसानिमीत्त धारासुर मर्दीनी देवीची आरती व महापुजा करण्यात आली. तसेच काळा मारुती मंदीर येथे मारुतीची आरती करण्यात आली तर खाँजा शमशोद्दीन गाजी रहे दर्गा येथे चादर चढविण्यात येऊन डॉ पाटील यांना निरोगी व दिर्घ आयुष्य लाभो अशी पार्थना भारतीय जनता पार्टीयांच्यावतीने करण्यात आली. यावेळी माजी नगराध्यक्ष तथा जिल्हा उपाध्यक्ष सुनील काकडे, माजी उपनगराध्यक्ष तथा शहराध्यक्ष अभय इंगळे, चंद्रजित जाधव, अभिजीत काकडे, बापु पवार, पांडुरंग लाटे, अमोल राजेनिंबाळकर, संदिप इंगळे, अमोल पेठे, राजकुमार पवार, किशोर पवार, शमी मशायक, आरेफ मुजावर, सलमान शेख, महेमुद मुजावर, रोहित देशमुख, सागर पवार, अनिल पवार, सागर दंडनाईक, समीर पठान, फहाद सिद्दिकी, प्रसाद मुंडे, चैतन्य माने आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

## होळकर यांच्या जयंतीनिमित्त २१ रक्तदात्यांनी केले दान



लोहारा दि.१ (प्रतिनिधी) – पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर जयंती उत्सव समितीतर्फे श्रीगीरे हॉस्पिटलमध्ये दि.१ जून घेण्यात आलेल्या रक्तदान शिबिराचे २१ रक्तदात्यांनी दान केले.

लोहारा येथे पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस पोलीस निरीक्षक अजित चिंतले यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून माजी प.स.सदस्य चंद्रकांत पाटील, उपनगराध्यक्ष आयुब शेख, माजी सरपंच नागण्णा वकील, शंकर जट्टे, माजी गटनेते अभिमान खराडे, शिवसेना (ठाकरे) तालुका प्रमुख अमोल बिराजदार, डॉ.हेमंत श्रीगीरे, माजी नगरसेवक श्रीनिवास माळी, भाजपा तालुका सरचिटणीस दगडू तिगाडे, विकास घोडके, पत्रकार गणेश खबोले, जयंती उत्सव समिति अध्यक्ष प्रशांत थोरात, रघुवीर घोडके, प्रेम लांडगे, आदी उपस्थित होते. या रक्ताचे संकलन सहयाद्री ब्लड बँकचे महेश तोडकरी, सोहेल कोतवाल, अनुजा नाईकवाडी, मयुरी बनसोडे यांनी केले. रक्तदान श्रेष्ठदान, आटत नसतो रक्ताचा झरा दर ३ महिन्यांनी रक्तदान करा या उक्तीप्रमाणे जयसिंग बंडगर, सद्दाम जमादार, श्रीनिवास माळी, डॉ.हेमंत श्रीगीरे, शिवम श्रीगीरे, शुभम वाघमारे, मंगेश बनशेट्टी, नागेश ढगे, उज्वल घोंगडे, नवनाथ फत्तेपुरे, उमराव देवकर, अर्जुन रसाळ, शहाजी जाधव, रोहन झिंगाडे, विकास घोडके, अनिकेत फरीदाबादकर, अनिल यल्लोरे, प्रभाकर बिराजदार, प्रविण वैरागकर या रक्तदात्यांनी रक्तदान केले. यावेळी रक्तदाते श्रीनिवास माळी यांचा ४० वेळा, प्रभाकर बिराजदार यांचा २५ वेळा रक्तदान करण्याचा विक्रम झाल्याचे सांगण्यात आले. तर शिवम श्रीगीरे यांनी प्रथमच रक्तदान केले. उमराव देवकर यांनी वाढदिवस असल्याने रक्तदान केले त्यांचा समितीतर्फे सत्कार करण्यात आला. शिबीर यशस्वी करण्यासाठी जयंती समितीचे अध्यक्ष प्रशांत थोरात, अंबादास विरोधे, रघुवीर घोडके, दगडू तिगाडे, प्रेम लांडगे, संदिप घोडके, जयसिंग बंडगर, अनिल यल्लोरे आदींनी परिश्रम घेतले.

## डॉ. आंबेडकर सहकारी साखर कारखान्याच्या शिवार फेरी व ऊस पीक चर्चासत्रास प्रतिसाद

धाराशिव दि.१ (प्रतिनिधी) – तालुक्यातील केशेगाव येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर सहकारी साखर कारखान्याच्यावतीने ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या शिवार फेरी व पीक चर्चा सत्रास शेतकऱ्यांनी चांगला प्रतिसाद दिला.

डॉ बाबासाहेब आंबेडकर सहकारी साखर कारखान्यापासून ४० किलो मीटर अंतरावर असणाऱ्या परिसरामध्ये ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी शेतामध्ये जाऊन ऊस पिकाची पाहणी करून शेतकऱ्यांना उसाचे उत्पादन वाढविण्यासाठी उसाचे बेण्यांमध्ये बदल करण्याची असलेली गरज शुद्ध प्रतीचे बेणे, टिशू कल्चरच रोपापासून बेने, प्लॉट करून परिसरामध्ये शुद्ध प्रतीचा ऊस वाढविण्यासाठी आवर्जून प्रयत्न करणे. तसेच या दुष्काळी परिस्थितीमध्ये ऊस पिकासाठी पाण्याचे योग्य नियोजन करणे व पाचटाचे आच्छादन केल्यामुळे पाणी बचत होऊन झिरो मशागत पद्धतीने खोडवा उत्पादन घेणे, उसात येणारे रोग किडी यांचे निरीक्षण करून त्यांचा बंदोबस्त करणे, शेतामध्ये जमिनीची सुपिकता, सामू वाढवण्यासाठी आवर्जून गांडूळ खत व कारखान्याद्वारे मिळणारे कंपोस्ट खत याचा वापर करणे, आपल्या जमिनीतील मातीचे योग्य प्रकारे माती नमुने घेऊन त्याचे माती परीक्षण करून कारखान्याच्यावतीने कारखान्याच्या प्रयोग शाळेमध्ये माती परीक्षण करून घेणे आदी विषयावर तज्ज्ञांनी सविस्तर मार्गदर्शन केले. त्यामुळे परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना उत्पादन खर्च कमी होऊन मिळणारा नफ्यामध्ये निश्चित वाढ होईल यासाठी कारखान्याच्यावतीने



जाणीवपूर्वक परिसरामध्ये मिळावे घेण्यात आले. तर ऊस पीक संदर्भात शेतकऱ्यांनी उपस्थित केलेल्या सर्व प्रश्नांची उत्तरे तज्ज्ञांनी दिली. तसेच वसंतदादा शूगर इन्स्टिटयूटच्यावतीने ना नफा ना तोटा या तत्त्वावर उपलब्ध असलेली उसासाठीच उपयुक्त द्रवरूप खते आदी कारखाना स्थळावरून शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्यात आली. शेतकऱ्यांसाठी कारखान्याच्यावतीने राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमाचे शेतकऱ्यांनी कौतुक केले. तसेच ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने राबविलेला हा उपक्रम निश्चित फायद्याचा असल्यामुळे शेतकऱ्यांनी कारखान्याचे संस्थापक अध्यक्ष सहकार रत्न, मराठवाडा भूषण अरविंद गोरे यांचे आभार मानले. विशेष म्हणजे हा कार्यक्रम शेतकऱ्यांच्या हितासाठी असल्यामुळे या पुढील ही काळात चालू राहणार असून जास्तीत जास्त शेतकरी ने याचा लाभ घ्यावा असे आवाहन गोरे यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी कारखान्याचे शेतकी अधिकारी शिनगारे, ऊस विकास अधिकारी गुळवे, संबंधित शेतकी मदतनीस यांनी अथक परिश्रम घेतले. या कार्यक्रमास डॉ.बाबासाहेब आंबेडकर को-ऑपरेटिव मल्टीस्टेट सोसायटीचे चेअरमन ॲड.चित्राव गोरे, कारखान्याचे संचालक ॲड. निलेश बारखडे - पाटील यांच्यासह कारखान्याचे आजी, माजी संचालक व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विचारपीठ

## वेगाचे आकर्षण, यमराजाचे निमंत्रण

देशाच्या कानाकोपऱ्यांत अपघातांच्या घटनांमध्ये वाढ होऊ लागली आहे. पुण्यातील अल्पवयीन मुलाने केलेल्या अपघातामुळे व त्यानंतर अपघात दडपण्यासाठी झालेल्या घडामोडींनी देशभर अपघाताला प्रसिद्धी मिळालेली आहे. अर्थात अल्पवयीनांकडून होणारे अपघात तसेच ड्रंक ण्ड ड्राईव्हच्या घटनांमधील अपघात हे अधूनमधून घडतच असतात. पण चालकांना वाहन चालविताना वेगाचे आकर्षण म्हणण्यापेक्षा व्यसनच जडल्याने अपघातांचा आलेख वाढतच चालला आहे. वाहतूक कोंडीची समस्या संपुष्टात यावी, वाहनचालकांसह प्रवाशांना वेळेवर इच्छितस्थळी पोहोचता यावे यासाठी केंद्र सरकारकडून व त्या त्या राज्यातील राज्य सरकार यांच्याकडून रस्ते रुंदीकरण, चौपदरी रस्ते, सहा पदरी रस्ते आदी कामे वेगाने केली जात आहेत. वेळ पडल्यास डोंगर फोडून, बोगदे तयार करून रस्ते बनविले जात आहेत. सुविधांसाठी बनविण्यात आलेले रस्तेच आज मृत्यूचा सापळा बनू लागले आहेत. तालुक्यात, जिल्ह्यात, शहरात, उपनगरात अपघाताच्या वाढत्या घटना चिंताजनक आहेत.

वाहने वेगाने हाकण्याचे वाहनचालकांना जडलेले आकर्षणरूपी व्यसनच आज अपघातांना कारणीभूत ठरत आहे. मुंबई-पुणे अंतर कापण्यास पूर्वी पाच ते सहा तास लागायचे; परंतु एक्स्प्रेस वेच्या निर्मितीनंतर हे अंतर आता तीन ते चार तासांत पार करणे शक्य झाले आहे. पूर्वीसारखा वाकड्या वळणाचा खंडाळा घाट ही प्रवासाची ओळख आता पुसली जाऊन तीन पदरी एक्स्प्रेस वे आता गेल्या काही वर्षांमध्ये परिचित झालेला आहे. त्यातच आता मिसिंग लिंक शोधून अंतर कमी करण्याचा प्रयत्न अंतिम टप्प्यात आला आहे; परंतु वाहनांची स्पर्धा आणि चालकांना अतिवेगाने वाहने दामटण्याची लागलेली सवय यामुळे मुंबई-पुणे एक्स्प्रेस वे मार्गावर कोठे ना कोठे आपणास अपघात झालेले पाहावयास मिळत आहेत. या अपघातांमुळे वाहतुकीची कोंडी होऊन सर्वांनाच मन:स्ताप सहन करावा लागत आहे. अवजड वाहनांसाठी ताशी किमी ८०, तर हलक्या वाहनांसाठी १००ची मर्यादा घालूनही या एक्स्प्रेस वेवर एकशे वीस ते दीडशेच्या वेगाने वाहने हाकताना चालकांना अभिमान वाटत आहे. एक्स्प्रेस वे मार्गावर जागोजागी सीसीटीव्ही कॅमेरे बसवूनही, दोन हजारांचे आर्थिक दंड होऊनही चालकांमधील वेगाचे आकर्षण कमी होत नाही.

नवी मुंबईमध्ये देखील वाशी ते बेलापूर दरम्यान सिडकोने निर्माण केलेल्या पाम बीच मार्गाचीही अवस्था थोड्या फार फरकाने तशीच झालेली आहे. १९९८-९९ च्या सुमारास सायन-पनवेल मार्गावरील तसेच ठाणे-बेलापूर मार्गावरील वाहतूक कोंडीवर तोडगा काढण्यासाठी सिडकोने वाशी सेक्टर १७ ते बेलापूर किल्ला चौकापर्यंत पामबीच मार्गाची खाडीमार्गालगतच निर्मिती केली. मार्गासभोवतालचे नैसर्गिक सौंदर्य, खाडीकिनारा, तीन पदरी मार्ग, एनआरआय वसाहतीचा शेजार, फ्लेमिंगोचे होणारे दर्शन हे वातावरण पाहून या मार्गाला 'क्विन ऑफ नेकलेस' असे संबोधले जाऊ लागले; परंतु हा मार्ग कार्यान्वित झाल्यानंतर या मार्गावर अपघाताचे जे प्रमाण सुरू झाले आहे, ते आजही कायम आहे. त्यामुळे या मार्गाला मृत्यूचा सापळा म्हणून कलंकित व्हावे लागले. या मार्गावर ताशी ६० किमीची मर्यादा असावी, असे फलक मोठ्या प्रमाणावर लावण्यात आले असले तरी दुचाकी वाहनदेखील या मार्गावरून ८० ते १००च्या वेगमर्यादेने धावताना पाहावयास मिळत आहे.

कधीतरी वाहतूक पोलिसांची वाहने वेग मोजणारी मशीन घेऊन पामबीच मार्गावर हजर असतात. पण केवळ महिन्या-दोन महिन्यांनी वाहतूक पोलीस वेग मोजत असल्याने वाहनचालकांना त्याचे फारसे सोयरसुतक राहिलेले नाही. आता सरकारने नव्याने कोस्टल रोडची मुंबई शहरात निर्मिती केली आहे. या मार्गावरही अपघात घडत आहेत. शिवडी ते वरळीदरम्यान सी ब्रिजची अर्थात सागरी सेतूची सरकारने निर्मिती केली आहे. सागरी सेतूमुळे मुंबई ते थेट पनवेल-उरण भागाशी विनाअडथळा संपर्क साधता यावा, वेळेची व इंधनाची बचत व्हावी हा राज्य सरकारचा हेतू होता. हा मार्ग कार्यान्वित झाल्यानंतर तेथेही अपघाताचा श्रीगणेशा झाला आहे. या मार्गाचा प्रवासासाठी कमी व पर्यटकांसाठी आकर्षणाचा अधिक वापर सुरुवातीच्या काळात झाला. या मार्गावर केवळ मार्ग पाहण्यासाठी मोठ्या संख्येने वाहने धावू लागली आहेत. रस्त्यावर थांबून सेल्फी काढण्याचे प्रकार वाढीस लागले आहेत.

वाहतूक पोलिसांनी दंड आकारूनही त्या मार्गावर सेल्फी काढण्याचा मोह आजही कमी झालेला नाही. वाहनामध्ये तांत्रिक बिघाड झाल्यास, ब्रेक फेल झाल्यास, इंजिनमध्ये बिघाड झाल्यास, टायर फुटल्यास अपघात झाले, तर एक वेळ समजण्यासारखे आहे. अशा घटनांना कोणीही आळा घालू शकत नाही; परंतु अशा प्रकारांनी अपघात घडण्याचे प्रकार अत्यल्प आहे. अधिकाधिक अपघात हे चालकांनी वाहनावरील नियंत्रण गमविल्यानेच होत आहेत. त्याखालोखाल मद्य पिऊन वाहने चालविल्याने अपघात होण्याचे प्रमाण आहे. अपघात झाल्यावर वाहनाचे नुकसान होते, हे वाहनाचे झालेले नुकसान एक वेळ विमा कंपन्यांकडून भरून निघेल. पण अपघातात जीवितहानी झाल्यास त्या घराचे न भरून येणारे नुकसान होते. कोणाला अपघातात अपंगत्व आल्यास त्याला कायमस्वरूपी सांभाळण्याची वेळ परिवारावर येते. घरातील वयोवृद्ध मातापित्यांना आपला मुलगा गमवावा लागतो, पत्नीला आपला पती, तर मुलांना आपले वडील गमवावे लागतात. चालकांना अति वेगाचे असलेले आकर्षण अनेक परिवारांचे नुकसान करत असते.

अपघाताची चौकशी केल्यावर अनेक चालक हे विनापरवानाही वाहने चालवत असल्याचे धक्कादायक प्रकार उजेडात आलेले आहेत. वेगाने वाहन चालविण्यापेक्षा सुरक्षित वाहन चालविणे आज काळाची गरज आहे, हे वाहनचालकांना पटवून देण्याची आज गरज निर्माण झालेली आहे. अपघाताच्या घटना पाहिल्यावर चालकांचे समुपदेशन करण्याची वेळ आज आलेली आहे. वेगाचे आकर्षण एका मर्यादेपर्यंत ठीक आहे. नियंत्रणात करता येईल इतपतच वेगाने वाहन हाकणे आवश्यक आहे. 'अतिघाई संकटात नेई' या सुभाषिताचे गांभीर्य समजून घेण्याची वेळ आलेली आहे. स्वत:ला जपा, वाहनाला जपा आणि प्रवाशांनाही जपा हे आज चालकांनी स्वत:हून मनावर बिंबविले, तर नक्कीच अपघाताच्या घटनांना आळा बसेल, अन्यथा वेगाचे आकर्षण म्हणजे यमराजाच्या घरचे निमत्रंण हे चालकांना समजावून सांगण्याची वेळ आज आलेली आहे.

## ह्या दिवसात गुळ खाल्ल्याने हे आजार होतात दूर!

गुळ हा एक असा खाद्यपदार्थ आहे ज्याचं सेवन आपण कोणत्याही ऋतूत करु शकतो. कारण गुळ वर्षाचे बाराही महिने कोणत्याही किराणा मालाच्या दुकानात सहज उपलब्ध असतो. तसंच गुळ खाण्याचे आरोग्यास असंख्य लाभ होतात. खास करुन थंडीच्या दिवसांत म्हणजेच हिवाळ्यात गुळ खाण्याचे काही खास फायदे होतात.

हिवाळा सुरु होताच आपल्याला स्वत:ला सुदृढ व निरोगी ठेवण्यासाठी आपल्या दैनंदिन दिनक्रमात अनेक विविध बदल करावे लागतात. कारण असं म्हटलं जातं की, हिवाळा हा रोगांचा ऋतू आहे. या काळात अनेक साथीचे रोग डोकी वर काढतात. त्यामुळे थोडासा



बेजबाबदारपणा देखील आपल्याला आजारांच्या विळख्यात फसवू शकतो. त्यामुळे या काळात खाणपानाच्या सवयींमध्ये बदल करणं अत्यंत आवश्यक असतं. हिवाळ्यात अशा अनेक पदार्थांचे सेवन करण्याचा सल्ला दिला जातो जे आपलं आरोग्य मजबूत बनवतात व सोबतच अनेक गंभीर आजारांचा धोका देखील कमी करतात.

आज आम्ही अशा अनेक उपयुक्त व आरोग्यदायी पदार्थांपैकी एका पदार्थाच्या लाभाविषयी सांगणार आहोत. ज्याचं नाव आहे गुळ! गुळाचा (क्षरससशी लशपशषळीी ळप ुळपींशी) गुणधर्म उष्ण असल्यामुळे थंडीत त्याचे शरीराला अनेक फायदे होतात. म्हणूनच डॉक्टरही गुळाचे सेवन करण्याचा सल्ला देतात. लाडू, पुरणपोळी असे विविध गोड पदार्थ हे पूर्वी गुळापासूनच बनवले जायचे. कारण गूळ हे उर्जेचे प्रतिक आहे. तसेच गूळ गरम असल्यामुळे त्याचे हिवाळ्यात सेवन केल्यानं शरीराला उर्जा मिळते. जाणून घेऊया गुळाचे फायदे नेमके कोणते आहेत.भारतात दरवर्षी हजारो लोक कडाक्याच्या थंडीमुळे आपला जीव गमावतात. त्यामुळे हिवाळ्यात प्रत्येक व्यक्तीनेच विशेष काळजी घेणं अत्यंत आवश्यक असतं. थंडीत गुळाचे सेवन केल्यास शरीराला उष्णता मिळते व थंडीपासून बचाव होतो. साथीच्या रोगांपासून बचाव करण्यास गुळ लाभदायक ठरतो. थंडीच्या दिवसांत शरिरातील रक्तप्रवाहाची गती मंदावते. ज्यामुळे रक्तदाबासारखे आजार उद्भवतात. ज्या लोकांची रोगप्रतिकारक क्षमता कमी असते अशा लोकांना गुळाच्या सेवनाचा खूप फायदा होतो. गुळामध्ये कॅल्शिअम आणि मॅग्नेशिअम ही जीवनसत्वे असल्यामुळे थकवा दुर होतो. घसा आणि फुफ्फुसातील संक्रमाणापासून वाचण्यासाठीही गुळाचे सेवन करणे फायद्याचे असते.


ज्या लोकांना मधुमेहाची समस्या असते ते लोक साखरेऐवजी गुळाचे सेवन करू शकतात. कारण गुळ हा नैसर्गिक साखर आहे. तसेच गुळाच्या सेवनामुळे पचनक्रियासुध्दा चांगली राहते.

तुम्हाला हे ऐकून आश्चर्य वाटेल पण अनेक वैज्ञानिक अध्ययनात हे सिद्ध झाले आहे की, गुळाचे सेवन केल्याने श्वसनतंत्राचे कार्य सुरूळीत होते. खास करुन थंडीच्या दिवसांत नाक बंद होण्याची समस्या प्रकर्षाने जाणवते. अशावेळी गुळाचे सेवन केल्यास ब्रीदिंग सिस्टम मजबूत होते. गुळाला क्लींजिंग एजंट देखील म्हटले जाते कारण ते श्वसन प्रणाली, फुफ्फुस, अन्न नलिका, पोट आणि आतडे शुद्ध करते. गुळाचे सेवन केल्यामुळे रक्ताभिसरण प्रक्रिया देखील सहजतेने होते.

जे लोक हाय ब्लड प्रेशर (हायपरटेन्शन) या समस्येतून जात असतील त्या लोकांनी हिवाळ्यात गुळाचे सेवन आवर्जून केले पाहिजे. गुळात असलेले सोडियम व पोटॅशियम हे गुणधर्म ब्लड प्रेशर कमी करण्यात विशिष मदत करतात. जे लोक ह्रदय रोगांनी ग्रस्त आहेत अशा लोकांनी डॉक्टरचा सल्ला घेऊन नियमित गुळाचे सेवन केले पाहिजे. गुळ शरीरात ॲसिडचं प्रमाण कँट्रोल करण्यास मदत करतो. त्यामुळे ब्लड प्रेशरही नियंत्रणात राहू शकतो. हिवाळ्यात कडाक्याच्या थंडीमुळे सर्दी-पडसे व खोकला असे साथीचे आजार अगदी सामान्य असतात. नॅशनल सेंटर फॉर बायोटेक्नोलॉजी इन्फॉर्मेशन अनुसार, गुळाच्या सेवनाने सर्दी व खोकल्यापासून आराम मिळतो. गुळाच्या सेवनाने शरीर उबदार होण्यास, जेवण लवकर पचण्यास, शरीराला आर्यन मिळण्यास मदत होते. घसा खवखवत असल्यास गुळ अतिशय उपयुक्त ठरतो. गुळ आणि आलं एकत्र गरम करुन खाल्ल्याने फरक पडू शकतो. सर्दी झाली असल्यास फक्त गूळ खाऊ नका, तर चहा किंवा लाडूमध्ये गुळाचा वापर करून ते खा. गूळ शरीरातील तापमान नियंत्रीत ठेवण्यास मदत करते. तसेच गुळामध्ये असलेल्या अँटी ॲलर्जिक गुणांमुळे दम्याच्या रुग्णांसाठी गूळ फायदेशीर ठरतो.

ज्या लोकांना कोणत्यातरी दुर्घटनेमध्ये गंभीर मार बसलेला असतो अशा वेदना हिवाळ्यात हमखास डोकँ वर काढतात. लागलेल्या जागी तीव्र वेदना होऊ लागतात. तसंच स्नायुदुखी असलेल्या लोकांनाही थंडीत जास्त त्रास होतो.रोज गूळ आणि आल्याचा तुकडा एकत्र करुन खाल्ला तर सांधे मजबूत होतात. हाडांना बळकटी मिळावी, यासाठी कॅल्शिअमयुक्त आहाराचे सेवन करावे. शरीराला पुरेशा प्रमाणात कॅल्शिअमचा पुरवठा झाल्यास हाडांशी संबंधित आजार उद्भवणार नाहीत. यासाठी गूळ आणि जिऱ्याचे सेवन करा. यातील पोषण तत्त्वांमुळे हाडे मजबूत होण्यास मदत मिळेल. नॅशनल सेंटर फॉर बायोटेक्नोलॉजी इन्फॉरमेशननुसार, जिरे आणि गुळामध्ये हाडांसाठी पोषक असलेल्या घटकांचा समावेश आहे. म्हणूनच वयोवृद्ध आणि खेळाडूंनी जिरे आणि गुळाचं सेवन करावे.

## जाणून घ्या टिकली लावल्याने होणारे फायदे



टिकलीचाही महिलांच्या १६ श्रृंगारमध्ये समावेश असून सौभाग्यवती महिला काही वर्षांपूर्वी कुंकवाचा वापर करत असत. पण कुंकवाचा वापर न करता टिकलीचा वापर सध्या महिलावर्ग मोठ्या प्रमाणात करताना पहायला मिळतात. महिला चेह-यावर लावण्यात आलेल्या टिकलीमुळे केवळ सुंदरच दिसत नाहीत तर त्याचे अनेक आरोग्यदायी फायदेही आहेत. टिकलीचा वापर सामान्यत: महिला ट्रेडीशनल लुकसाठी करतात. पण एका अभ्यासानुसार आरोग्यालाही टिकलीमुळे अनेक फायदे होतात. यामुळेच टिकलीचा वापर अनेक महिला करत आहेत. एवढेच नाही तर वेस्टर्न कपडे परिधान करणा-या महिलाही आपल्या ड्रेसनुसार कलरफुल टिकली वापरण्यास सुरुवात करत आहेत. चेह-यावरील टिकलीमुळे महिला खुपच सुंदर दिसतात आणि त्यामुळे अनेक आरोग्यदायी फायदेही होतात. कपाळावर टिकली लावण्याने अनेक फायदे होतात.

कपाळावर टिकली लावल्यामुळे डोक दुखणे बंद होते. ॲक्युप्रेशर नुसार कपाळावर ज्या ठिकाणी टिकली लावण्यात येते त्या जागेवर मसाज केल्यास डोकेदुखी तात्काळ बंद होते. टिकली लावलेल्या जागेवर मसाज केल्यास नाकाच्या आस-पास ब्लड सर्क्युलेशन चांगल्या पद्धतीने होण्यास सुरुवात होते, ज्यामुळे तुम्हाला खुपच आराम मिळतो.टिकली दोन्ही भुवयांच्या मध्यभागी ज्या ठिकाणी लावली जाते शरीरातील सर्व नसा त्याच केंद्रावर एकत्र येतात. टिकली लावण्यात येणाऱ्या या जागेला अग्नि चक्र या नावाने सुद्धा ओळखले जाते. म्हणूनच टिकली लावल्याने एकाग्रताही वाढते आणि मन शांत राहते. तसेच, टिकली लावल्याने ताण-तणावही कमी होतो.तुम्हाला पूर्ण झोप मिळत नाही आणि त्यामुळे तुम्ही त्रस्त आहात तर टिकली लावणे तुमच्यासाठी खुपच फायदेशीर होऊ शकते. टिकली शरीरच्या वरच्या भागाला शांत ठेवण्यासाठी खुपच फायदेशीर ठरते. कपाळावर टिकली लावल्याने चांगली झोप येते.

टिकली डोळ्यांच्या नसा मजबूत करण्यास खुपच मदत करते. टिकली कपाळ्याच्या मध्यभागी ज्या ठिकाणी लावली जाते त्या ठिकाणच्या नसा आणि डोळ्यांमधील नस यांच्यात एक कनेक्शन असते. टिकली डोळ्यांच्याच्या नसांना मजबूत करण्यास मदत करते ज्यामुळे तुम्हाला एकदम स्पष्ट आणि साफ दिसण्यास मदत होते. एवढेच नाही तर टिकली लावल्याने आस-पासचे मसल्स मजबूत आणि हेल्दी होतात.तुमच्या चेह-यावर जर सुरकुत्या पडण्यास सुरुवात होत आहे तर टिकली लावण्यास तुम्ही सुरुवात करा. कारण, टिकली लावल्याने चेह-यावर येणा-या सुरकुत्यांपासुन सुटका मिळण्यास मदत होते.

## मधुमेह : जंतुसंसर्ग नि करोना

सर्वानीच आपापल्या परीने सणाचा मनमुराद आनंद लुटला. फराळाच्या जोडीने श्रीखंड, बासुंदी, पुरणपोळी अशा पक्वान्नांचा यथेच्छ समाचार घेतला गेला. दिवाळी हा सर्वाचा प्रिय सण. यानिमित्ताने गेले कित्येक महिने मुखपट्टीच्या मागे दडलेले चेहरे मोकळे झाले. सर्वानीच आपापल्या परीने सणाचा मनमुराद आनंद लुटला. फराळाच्या जोडीने श्रीखंड, बासुंदी, पुरणपोळी अशा पक्वान्नांचा यथेच्छ समाचार घेतला गेला. मात्र यामुळे मधुमेहींची साखरेची पातळी वाढली. प्रदूषण, सामाजिक अंतर न पाळणे व मधुमेह या त्रिकुटामुळे श्वसनसंस्थेच्या विकारांचा धोका (सर्दी, खोकला, घसा दुखणे व खवखवणे, ताप, शिंका, दमा) मोठय़ा प्रमाणावर वाढला. अशा परिस्थितीत तीव्र संसर्गाला बळी पडणारी व्यक्ती ही मोठय़ा प्रमाणात मधुमेही असू शकते. त्याची कारणे, प्रतिबंधात्मक उपाय आणि संरक्षण याविषयी मार्गदर्शन.

मधुमेहात वाढणारी साखरेची पातळी सर्वश्रुत आहे. इन्शुलिन तयार न होणे किंवा इन्शुलिन तयार होऊनही पेशींवरील कार्यात व शर्करा ज्वलनात अडथळा निर्माण होणे यांमुळे साखरेचे प्रमाण वाढू लागते. वाढलेल्या साखरेमुळे कोणताही जंतुसंसर्ग लवकर होतो. साखरेची पातळी अधिक असेल तर कोणत्याही विषाणूची बाधा लवकर होते. म्हणूनच कोविड- च्या या विषाणूस दूर ठेवण्यासाठी मधुमेहींनी आपल्या साखरेवर नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे. साखरेची वाढलेली पातळी ही आपली प्रतिकारशक्ती कमी करते, लढाईसाठी सज्ज असणारी सेना कमकुवत करते आणि त्यामुळे करोनाची लागण झाल्यास त्याची तीव्र लक्षणे निर्माण होऊ शकतात. आयुर्वेदात साखर ही कफकारक मानली आहे व कफज रोगांना (सर्दी, कफयुक्त खोकला, दमा) आमंत्रण देणारी ठरते. करोनामध्ये हीच लक्षणे प्रामुख्याने आढळून येतात आणि जीवघेणी ठरू शकतात. मधुमेहींना करोना झाल्यास ऊळरलशींळल घशींरलळवीोळी हा तीव्र उपद्रव निर्माण होऊ शकतो. यामुळे ऱ्हास होतो व जंतुसंसर्गास अटकाव करणे कठीण होते.



## थंडीत आयुर्वेदानुसार कोणते तेल वापरल्यास मिळतील जास्त लाभ? जाणून घ्या

हिवाळ्यामध्ये बॉडी मसाज करणं केवळ शरीरासाठीच नव्हे तर त्वचेसाठीही लाभदायक असते. यामुळे आपल्या त्वचेला पोषण तत्त्वांचा पुरवठा होतो. पण मसाज करण्यासाठी कोणत्या तेलाचा वापर करणं ठरेल सर्वाधिक लाभदायक? थंडीच्या दिवसांमध्ये आपल्या शरीराची देखभाल करणं अतिशय आवश्यक आहे. स्नायू मजबूत राहण्यासाठी आणि त्वचा चमकदार दिसण्यासाठी शरीराचा तेलाने मसाज करावा. आयुर्वेदातील माहितीनुसार हिवाळ्यात गरम तेलाने मसाज करणं आरोग्यासाठी फायदेशीर मानले जाते. थंडीमध्ये आठवड्यातून तीन वेळा बॉडी मसाज करणं अत्यावश्यक मानले जाते. मसाजमुळे शरीरातील रक्तप्रवाह सुरळीत सुरू राहतो. यामुळे सर्दी-खोकल्यापासून शरीराचे संरक्षण देखील होण्यास मदत मिळते. कोणत्याही नैसर्गिक तेलाच्या मदतीने आपण बॉडी मसाज करू शकता. पण मसाज करण्यासाठी काही खास आयुर्वेदिक तेलांचा उपयोग केल्यास आरोग्यासाठी अधिक फायदेशीर ठरू शकतं. जाणून घ्या या तेलांची सविस्तर माहिती.

आयुर्वेदातील माहितीनुसार हिवाळ्यामध्ये तिळाच्या तेलाचा वापर करणं चांगले मानले जाते. हे तेल आपली त्वचा अतिशय सहजरित्या शोषून घेते. तिळामध्ये भरपूर प्रमाणात पोषण तत्वांचा समावेश आहे. ज्यामुळे त्वचेशी संबंधित समस्या दूर होण्यास मदत मिळते. संशोधनातील माहितीनुसार तिळामध्ये नैसर्गिक स्वरुपात एसपीएफ सनस्क्रीन गुणधर्म आहेत. ऑलिव्ह ऑइलमध्ये कित्येक प्रकारच्या व्हिटॅमिन आणि खनिजांचा समावेश आहे. हे गुणधर्म थंडीच्या दिवसात आपल्या त्वचेसाठी नैसर्गिक स्वरुपात मॉइश्चराइझर प्रमाणे कार्य करतात. हे तेल ओल्या त्वचेवर लावून हलक्या हाताने मसाज करावा. कोरड्या त्वचेची समस्या दूर करण्यासाठी हे ते अतिशय लाभदायक आहे. यामध्ये अँटी ऑक्सिडंट देखील मोठ्या प्रमाणात आहेत. त्वचा तसंच केसांची देखभाल करण्यासाठी बदामाच्या तेलाचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. बदाम तेलाचा योग्य पद्धतीने वापर केल्यास आपल्या त्वचेला खोलवर पोषण तत्त्वांचा पुरवठा होण्यास मदत मिळते. या तेलामुळे त्वचेला नैसर्गिक स्वरुपात मॉइश्चराइझर मिळते. यामुळे त्वचेचा रंग आणि पोत चांगला राहतो.नारळाचे तेल त्वचेसाठी अतिशय लाभदायक मानले जाते. कारण यातील पोषण तत्त्व त्वचेचं बॅक्टेरियांपासून संरक्षण करतात. नारळाच्या तेलामध्ये लोह भरपूर प्रमाणात असते. या तेलाने मसाज केल्यास शरिरात रक्तप्रवाह चांगल्या पद्धतीने सुरू राहतो.या तेलामध्ये ओमेगा फॅटी ॲसिड आणि ओमेगा फॅटी ॲसिड भरपूर प्रमाणात आहेत. यामुळे आपल्या ह्रदयाचे आरोग्य निरोगी राहते आणि त्वचेचा रंग देखील उजळतो. आपण या तेलाचा स्वयंपाकामध्येही समावेश करू शकता. थंडीच्या दिवसात या तेलानं शरीराचा मसाज केल्यास त्वचा मऊ आणि चमकदार होते. त्वचेतील ओलावा टिकून राहण्यास मदत मिळते. या तेलाचा आपण मॉइश्चराइझिंग लोशनच्या स्वरुपातही वापर करू शकता.

आपल्या देशामध्ये मोहरीच्या तेलाचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. काही जण आंघोळ करण्यापूर्वी या तेलानं शरीराचा मसाज करतात. तेलामधील मॉइश्चराइझिंग गुणधर्म त्वचा मऊ आणि चमकदार ठेवण्याचे कार्य करतात. थंडीच्या दिवसांत शरीराचा मसाज करण्यासाठी हे तेल सर्वोत्तम पर्याय आहे.

## काढ्याचं अतिसेवन करताय? मग जाणून घ्या डॉक्टरांनी दिलेली ही माहिती

रोगप्रतिकार शक्ती वाढवणाऱ्या काढ्यांची (घरवहर) माहिती देणारे व्हिडीओज सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहेत. ते बघून अनेक जण काढ्याचं सेवन करतात. कित्येकदा करोना संसर्गापासून दूर राहण्यासाठी काढ्यांचं अतिप्रमाणात सेवन करतात. याचे दुष्परिणाम समोर येऊ लागले आहेत. याबाबत जनरल फिजिशियन डॉ. संजय शहा यांनी माहिती दिली आहे.

कोविड-वरील लशीची प्रतीक्षा अवघं जग करत आहे. आताही करोना विषाणूचा संहार सुरूच आहे. विषाणूचा प्रसार कसा रोखावा, संभाव्य प्रादुर्भाव कसा टाळावा याबद्दलच्या बेसुमार माहितीचा प्रसार सुरू आहे. काही विशिष्ट 'डीआयवाय इम्युनिटी बूस्टिंग कॅन्कोक्शन्स'च्या सेवनानं स्वत:ला सुरक्षित कसं ठेवावं याची माहिती सोशल नेटवर्किंग प्लॅटफॉर्म्सवर व्हायरल होत आहे. पण, हे घरी तयार केलेले काढे घेणाऱ्या लोकांना त्याचे साइड-इफेक्ट्स जाणवत आहेत, असं तज्ज्ञांचं निरीक्षण आहे. हे घरगुती उपाय मोठ्या प्रमाणात केले जात असल्यानं ही समस्या वाढत आहे.

कोविड- संसर्गाच्या भीतीमुळे काढ्यांचं सेवन वाढलं आहे. त्यात आलं, लिंबू, लसूण, हळद, मिरे, कोरफड आणि बोरवर्गीय फळांचा समावेश होतो. या घरगुती काढ्यांच्या अतिरिक्त सेवनाचे दुष्परिणाम समोर येऊ लागले आहेत. हे एका उदाहरणावरुन स्पष्ट करतो. एका तरुण रुग्णामध्ये शस्त्रक्रियेनंतर रक्तस्राव होत असल्याचं आढळलं. रुग्णाच्या केसचा संपूर्ण अभ्यास केल्यानंतर आणि वैद्यकीय इतिहासाचे तपशीलवार मूल्यमापन केल्यानंतर आमच्या असं लक्षात आलं की, रुग्ण घरी केलेल्या काढ्याचं मोठ्या प्रमाणात सेवन करत होता. त्यामुळे त्याच्या शरीरात अंतर्गत रक्तस्राव सुरू झाला.

आणखी एका रुग्णाला श्वास घेण्यास प्रचंड त्रास होत होता. तो अशक्त झाला होता आणि त्याच्या रक्तातील हिमोग्लोबिनची पातळी खालावली होती. चौकशी केली असता असं कळले की, तो वर्षांचा रुग्ण गेल्या पाच महिन्यांपासून घरी केलेल्या काढ्याचं चार ते पाच वेळा सेवन करत होता. रुग्णाने माहितीच्या अभावामुळे अंतर्गत रक्तस्रावाचा धोका ओढवून घेतला होता. तसंच त्याच्या जठरात अल्सर्स झाले होते. त्याला वेळेत रुग्णालयात आणलं गेलं नसतं तर त्याच्यासाठी ते प्राणघातक ठरू शकलं असतं.



घरगुती मिश्रणांबद्दलचे सोशल मीडियावरील मेसेजेस किंवा जीवनसत्वे व रोगप्रतिकारशक्ती वाढवणाऱ्या पदार्थांचं मार्केटिंग यामुळे प्रभावित होणाऱ्यांची संख्या जास्त आहे. त्यांनी एक गोष्ट कायम लक्षात ठेवावी, जादूची गोळी किंवा औषध असं काही अस्तित्वातच नसतं. कोविड-आजारापासून सुरक्षित राहण्यासाठी हे घरगुती काढे बहुतेकदा घरातील प्रत्येकाला दिले जातात. पण, या काढ्यांना प्रत्येक व्यक्तीची प्रकृती वेगवेगळा प्रतिसाद देते, हे लक्षात घेतलं पाहिजे. निसर्गाचा नियम आहे की, कोणताही पदार्थ योग्य पद्धतीनं आणि योग्य प्रमाणात सेवन केला असता त्याचा लाभ होतो. पण, ते बेजबाबदारपणे घेतल्यास घातक ठरू शकतो. ज्या व्यक्तींना अन्य काही आजार (कोमॉर्बिडिटीज) आहेत, विशेषत: जे रुग्ण रक्त पातळ करणारी औषधं किंवा अन्य जुन्या आजारांसाठी औषधं घेत असतात त्यांच्यासाठी हे काढे घातक ठरू शकतात. यातून रक्तस्रावाची प्रवृत्ती वाढू शकते. रक्तस्राव कुठून होतो यावरही बरंच काही अवलंबून आहे. काही ठिकाणांहून होणारा रक्तस्राव फार धोकादायक नसतो, तर मेंदू किंवा आतड्यांतून होणारा रक्तस्राव प्राणघातक ठरू शकतो.

उष्ण मिश्रणांचं सेवन केल्यास तोंडातून रक्तस्राव होणं किंवा अल्सर्स यासारखे साइड-इफेक्ट्स जाणवू शकतात. घरी केलेल्या मिश्रणांतील मसाल्यांमुळे शरीरात अतिरिक्त उष्णता निर्माण होते आणि त्यामुळे नाकातून रक्तस्राव होऊ शकतो. यामुळे अन्ननलिकेत घर्षण निर्माण होऊन एसोफॅगीयल इरोजन होऊ शकतं. यातून गॅस्ट्रो-एसोफॅगीयल रिफ्लक्स होऊन पचनावर परिणाम होऊ शकतो. यामुळे रोगप्रतिकारशक्तीवर परिणाम होण्याची शक्यता निर्माण होते. हळद किंवा कोरफडीसारखे घटक पदार्थ अतिरिक्त प्रमाणात घेतल्यास त्याने यकृताला धोका पोहोचू शकतो. यकृताला हानी पोहोचली असता किंवा प्रादुर्भाव झाला असता, कावीळ होण्याची शक्यता असते. यामुळेही यकृतात रक्तस्राव होऊ शकतो. परिणामी, प्राणघातक लिव्हर फेल्युअर किंवा दुखापतीत होऊ शकतात. अर्सेनिक अल्बम हे आणखी एक मोठ्या प्रमाणात वापरलं जाणारं इम्युनिटी बुस्टर आहे. हे मर्यादित आणि तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली घेतलं तर एखाद्याच्या आरोग्याला लाभदायक ठरू शकतं. पण, याचा अतिरिक्त वापर केल्यास मूत्रपिंड, यकृत किंवा मेंदूवर घातक परिणाम होऊ शकतो. काही वेळा अर्सेनिक टॉक्झिसिटीमुळे रुग्णाची शुद्ध हरपते आणि त्याला अतिदक्षता विभागात ठेवण्याची गरज भासू शकते.

'ड' जीवनसत्व ही रोगप्रतिकारशक्तीची गरज आहे असा प्रसार मोठ्या प्रमाणात केला जातो. 'ड' जीवनसत्व अतिरिक्त झाल्यास शरीरातील कॅल्शिअमचं प्रमाण वाढतं आणि त्यामुळे व्यक्तीची सतत चिडचिड होणं, काही वेळा शुद्धही हरपणं असे परिणाम दिसू शकतात. 'ड' जीवनसत्वाची पातळी वाढल्यामुळे रक्त आणि लघवीतील कॅल्शिअमची पातळी वाढते. यामुळे मळमळ, डिहायड्रेशन, सुस्ती आणि यासारखे अनेक परिणाम दिसू लागतात. हे घटक मर्यादित प्रमाणात आणि वैद्यकीय मार्गदर्शनाखाली घेतल्यास निरुपद्रवी असतात हे लक्षात घेणं महत्त्वाचं आहे. पण, असंतुलित सेवनाचे गंभीर परिणाम होऊ शकतात. त्यामुळे जागरूक राहा आणि सुरक्षित राहा. कोणत्याही घरगुती काढ्याचं सेवन करण्यापूर्वी आपल्या फिजिशिअनशी बोला आणि त्यातील प्रत्येक घटकाची भूमिका समजून घ्या. तो किती वारंवार घेणं योग्य आहे ते समजून घ्या. बेजबाबदारपणे काढे घेऊ नका.

हे पत्र मालक, मुद्रक व प्रकाशक **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** यांनी मे. यशवंत प्रिंटींग प्रेस, ५१, एमआयडीसी, लातूर येथे छापून दैनिक यशवंत कार्यालय, गांधी मार्केट, लातूर येथे प्रसिध्द केले. शहर कार्यालय-गांधी मैदान, लातूर,दूरध्वनी-२४६९४६, मुख्य कार्यालय -५१, एमआयडीसी, लातूर, दूरध्वनी-२२०२४६,फॅक्स(०२३८२)२२०१४१, उस्मानाबाद कार्यालय दूरध्वनी-(०२४७२)२२८९१२, सोनवणे : ९४०२९ ४९६०७ परभणी कार्यालय - दूरध्वनी - २२१४५३, उदगीर कार्यालय-(०२३८५) २५३९९८.राम मोतीपवळे : ८५०२२८२४० (अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील विचाराशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
संस्थापक संपादक-**प्रा.बी.व्ही.मोतीपवळे,** संपादक - **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे ईमेल** : dailyyashwant@gmail.com, omj7@rediffmail.com

# माणसांनी काय बनावे बदक की गरुड?,निर्णय तुमचा आहे

डिजिटल इंडिया बनल्याचा प्रधानमंत्री आदरणीय नरेंद्र मोदी हे गर्वाने सांगतात.त्याचा प्रधान सेवक,चौकीदार आणि अंधभक्तांसह अनेकांना आनंद वाटते.पण प्रश्न ग्राहक मालकाचा नाही.ग्राहक एक अशी व्यक्ती किंवा व्यक्तीचा गट आहे ज्याचा वस्तूची खरेदी-विक्री करण्याच्या कामकाजाशी संबंध नसून वस्तू किंवा सेवा प्रामुख्याने वैयक्तिक, सामाजिक,कुटुंब,घरगुती आणि तत्सम गरजा भागविण्यासाठी,किंवा वापरण्याच्या कामकाजाशी संबंध आहे.सुरक्षेचा हक्कः आरोग्यासाठी किंवा आयुष्यासाठी घातक असलेल्या किंवा इतर पद्धतींपासून संरक्षण करण्यासाठी आणि त्याला माहिती निवडण्यासाठी आवश्यक असलेला अधिकार असतो. डिजिटल इंडियामुळे रोजगार,महागाई भ्रष्टाचार,शिक्षण,आरोग्यात काय बदल झाला.फसवणूक करण्याचा प्रकार वाढला कि कमी झाला. सेवा देण्याच्या नांवावर कोणता धंदा जोरात आहे.कष्ट करणाऱ्यांना किंमत नाही.आणि वाताकुलीत वातावरणात आरामशीर काम करणाऱ्याचे महत्व जास्तच वाढले. असो...

२८ ऑक्टोबरला अमरावती एक्सप्रेस रेल्वेने मुंबई ते नांदुरा प्रवास केला.नांदुरा येथे गाडी सकाळी ४.४३ वाजता पोचते.येवढा सकाळी ग्रामीण भागातील खेड्यात जाणे अशक्य असते त्यासाठी सकाळचे सात वाजे पर्यंत वाट पाहण्याशिवाय पर्याय नसतो.दुसरा पर्याय असतो तीन चार पट परतीचे भाडे देऊन रिक्षा घेऊन जाणे. यात प्रचंड धोका असतो. अनोळखी माणसां बरोबर प्रवास आणि मुंबई वरून आलेले ग्राहक.अशा वेळी ग्राहक म्हणून ग्रामीण भागातील खेड्यातून थंडीच्या दिवसात ३.३० वाजता उठून नांदुरा येथून मुंबईच्या पाहुण्यांना आणायला जाणे म्हणजेच पैसासाठी ग्राहकासाठी जाणे नव्हे तर माणुसकीची बांधिलकी ठेऊन सेवा देणे होय.शंकर खराटे रिक्षा चालक मालक मुक्काम पोस्ट खुमगांव बुर्ती,तालुका नांदुरा,जिल्हा बुलढाणा यांनी आम्हाला घेऊन जाण्यासाठी साडेचार वाजताच उपस्थित राहणे,स्टेशन बाहेर पडताच समोर येऊन स्वागत करणे आमच्यासाठी अपेक्षित नव्हते.तो सुखद धक्का त्यांनी दिला,नांदुरा ते खुमगांव पर्यंतचा प्रवास रोडवरील खड्डे त्यांची कोणीच दखल घेत नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.खड्डे सांबळात चर्चा करत नारायण भिडे साडूच्या घरी त्यांनी सुखरूप पोचवले.त्याचं वेळी मला परदेशातील टॅक्सी चालक मालकांची आठवण झाली. आणि माणसांनी काय बनावे बदक की गरुड?,निर्णय तुमचा आहे.ही गोष्ट आठवली तेच तुमच्या समोर मांडत आहे.

एकदा विमानतळावर असताना माझी एका टॅक्सी चालकाशी गाठ पडली आणि त्याच्या टॅक्सीत सर्वप्रथम माझ्या नजरेस एक गोष्ट पडली ती म्हणजे,एक पाटी जिच्यावर लिहिले होते की माणसांनी काय बनावे बदक की गरुड?, निर्णय तुमचा आहे. तुम्हीच ठरवा. दुसरी गोष्ट जाणवली ती स्वच्छ आणि चकचकीत गाडी, ड्रायव्हर अतिशय टापटीप आणि स्वच्छ आणि इस्त्रीच्या ड्रेस मध्ये होता. स्वच्छ पांढरा इस्त्रीचा शर्ट आणि पँट वर टाई.ड्रायव्हर स्वतः उतरून गाडीबाहेर आला आणि त्याने माझ्यासाठी गाडीचा दरवाजा उघडला.आणि बोलला, माझे नाव जॉन आहे. आणि मी तुमचा वाहक आहे.जो पर्यंत मी तुमचे समान गाडीच्या डिकीत ठेवतो तोपर्यंत आपण माझे हे मिशन कार्ड वाचावे सर.त्या कार्ड वर लिहिले होते,जॉन चे मिशन माझ्या ग्राहकांना लवकरात लवकर,सुरक्षित आणि रास्त दरात त्यांच्या इच्छित स्थळी पोहचवणे आणि तेसुद्धा आल्हाददायक आणि मैत्रीपूर्ण वातावरणामध्ये.

मी भारावून गेलो होतो. गाडीतील आतील बाजूही तेवढीच टापटीप आणि स्वच्छ,नीटनेटकी होती.जॉन ने मला विचारले. आपल्याला कॉफी घ्यायला आवडेल काय? मला त्याची गंमत करायची लहर आली म्हणून मी त्याला म्हणालो. नाही, मला ज्यूस हवा आहे.तात्काळ जॉन उत्तरला. काही हरकत नाही सर,माझ्याकडे तीन वेगवेगळ्या थर्मास आहेत. ह्यापैकी एकात ज्यूस,एकात डायट ज्यूस आणि एकात पाणी आहे. तुम्हाला वाचायचे असेल तर माझ्याकडे आजचे वर्तमानपत्र आणि काही मासिके आहेत.जेव्हा आमचा प्रवास चालू झाला तेव्हा जॉन मला म्हणाला की जर मला गाणी किंवा बातम्या ऐकायच्या असतील तर हा रिमोट आहे आणि ह्या वरील नंबर्स प्रमाणे तुम्ही तुम्हाला पाहिजे त्याचा आनंद घेऊ शकता.मला अजूनही धक्का बसायचा बाकी होता. कारण पुढे त्याने अत्यंत मार्दवपूर्ण स्वरात विचारले.सर,एसी चे तापमान ठीक आहे की आपणास काही वेगळे हवे आहे?. त्यानंतर त्याने मला माझ्या गंतव्य स्थानी जाण्याचा सर्वात चांगला मार्ग कोणता आहे हे सांगितले आणि पुढे विचारले की, तो माझ्याशी बोललेले चालेल की त्याने शांत राहावे?. न राहवून मी त्याला विचारले.तू नेहमी तुझ्या ग्राहकांना अशी सेवा देतोस?. त्यावर तो उत्तरला. नेहमी नाही, दोन वर्षांपासून देतो आहे. माझ्या सुरवातीच्या काळात मीही इतर टॅक्सी चालकांसारखा सतत तक्रार करीत असे.आणि असमाधानी राहत असे.पण एकदा एका डॉक्टर कडून मी व्यक्तिमत्त्व सुधारणांबाबत ऐकले. त्यांनी एक पुस्तक लिहिले होते. त्याचे नाव होते.तुम्ही जे कोणी आहात त्याने काय फरक पडतो. ज्यात पुढे लिहिले होते. जर तुम्ही सकाळी उठून असा विचार कराल की आज दिवस वाईट जाणार आहे. फक्त अडचणीच आहेत तर खरेच तसेच होईल.तुमचा तो दिवस वाईट आणि अडचणींचा जाईल.

बदक बनू नका,गरुड बना.बदक फक्त आणि फक्त आवाज करतो. प्रत्येक गोष्टीवर प्रतिक्रिया देतो. आणि गरुड सर्व समुदायापासून वेगळा आणि उंच उडतो.आणि माझ्या लक्षात आले की मी सतत रडतो आहे फक्त तक्रारी करतो आहे.म्हणून मी स्वत:ला बदलण्याचे ठरविले. माझ्या दृष्टिकोनात बदल करून गरुड बनण्याचे ठरविले.मी इतर टॅक्सी चालकांकडे बघितले. अस्वच्छ,गलिच्छ टॅक्सीज आणि आडमुठे चालक आणि म्हणून असमाधानी ग्राहक. असे चित्र होते ते.मी काही बदल करायचे ठरवले. आणि माझ्या ग्राहकांनी त्याला उत्तम प्रतिसाद दिल्यामुळे नंतर आणखी काही बदल करीत गेलो. आणि गरुड बनण्याचा निर्णय घेतल्यानंतर पहिल्याच वर्षी माझा व्यवसाय दुप्पट झाला आणि ह्यावर्षी आत्तापर्यंतच्या चौपट झालेला आहे.

तुम्ही सुदैवी आहात की आज मी तुम्हाला इथे सापडलो. अन्यथा आजकाल माझे ग्राहक माझ्याकडे आगाऊ रिझर्व्हेशन करून माझी टॅक्सी सेवा घेत असतात.किंवा मला मेसेज करून माझी टॅक्सी बुक करतात. मला शक्य नसेल तेव्हा मी अन्य गरुड बनलेल्या टॅक्सीचालक द्वारे ती सेवा ग्राहकाला पुरवतो. जॉन बदलला होता. तो साध्या टॅक्सीतून लुमोझीन कार सर्व्हिस पुरवत आहे.जॉन ने बदका सारखे सतत आवाज करत,सतत तक्रार करणे सोडून दिले आहे.आणि गरुडासारखी भरारी मारायला सूरूवात केली आहे.तुम्ही कुठे आणि काय काम करता याने काहीही फरक पडत नाही तर तुम्ही ते कसे आणि कोणत्या मनोभूमिकेतून करता याने नक्की फरक पडतो. तुम्ही काय ठरवले आहे?.बदकासारखे सतत आवाज करत (रडत) तक्रार करत राहणे की गरुडासारखे सगळ्यांपेक्षा वर उडण्याचे?.लक्षात ठेवा.निर्णय तुमचा आहे.हे कुलूप फक्त आतून उघडते.म्हणूनच माणसांनी काय बनावे बदक की गरुड?,निर्णय तुमचा आहे. असतो, ग्रामीण भागातील खेड्यातील शंकर खराटे याने थंडीचे कारण देऊन येणे टाळले असते तर आम्हाला थंडीत दोन तीन तास रिक्षाची वाट पाहण्या शिवाय पर्याय नसता.तर दुसरा पर्याय निवडला असता तर अनोळखी रिक्षावाला आणि त्यांच्या अनोळखी रोडमुळे त्याला खाड्याचा अंदाज आला नसता.त्याला जास्त पैसे देऊन ही त्यांचा साहजिकच शारीरिक त्रास आम्हाला झाला असता.म्हणूनच माणसांनी काय बनावे बदक की गरुड?, निर्णय तुमचा आहे. आम्हाला शंकर खराडे चालक मालक गरुडा सारखा वाटला तसेच आम्ही शंकर ला ग्राहक प्रवासी निश्चितच गरुडा सारखे वाटले असणार.

-सागर रामभाऊ तायडे,
९९२०४०३८५९,भांडुप,मुंबई.

## गुरू वचन

मनुष्याच्या विकासात आई-वडिलांची महत्वाची भूमिका असते. ते मुलांना वाढवतात व त्यांना स्वत:च्या पायावर उभे राहण्यास सक्षम बनवतात. तसेच मरेपर्यंत आपल्या मुलांच्या कल्याणाचीच प्रार्थना करतात.जगातील सर्व देवता, पैगंबर, साधु-संत व महापुरुषांनी आई-वडिलांच्या सेवेस पुण्य कर्म संबोधले आहे. भगवान बुद्धांनी देखील या सत्याचा अनुभव केला होता म्हणून त्यांनी जीवनात आई-वडिलांना महत्वपूर्ण स्थान दिले. आपल्या उपदेशात ते नेहमी आई-वडिलांची सेवा करण्यास सांगत होते. बौद्ध धर्माचा ग्रंथ सुत्तानिपातच्या पराभव सुत्तात भगवान बुद्धांनी देवास उपदेश देत सांगितले आहे की, जो व्यक्ती आपल्या आई-वडिलांचा सांभाळ किंवा पालन-पोषण करत नाही, त्याचा नाश निश्चित असतो. या ग्रंथाच्या महामंगल सुत्तात बुद्ध म्हणतात की, आई-वडिलांची सेवा करणे सर्वोच्च मंगल कार्य आहे. धम्मिक सुत्तात गृहस्थ धर्माची व्याख्या करत ते सांगतात की, जो धर्मानुसार आई-वडिलांची

## आईच्या संरक्षणासाठी जीव दिला

सेवा करतो, तो स्वयंप्रभ नावाच्या देवलोकात उत्पन्न होतो.

बौद्ध धर्माचा प्रसिद्ध ग्रंथ धम्मपदात बुद्ध सांगतात, जगात आई-वडिलांची सेवा सुखकर असते. बुद्धांनुसार आई-वडिलांचे स्थान सर्वोच्च असते. आई-वडिल आपल्या मुलांचे पालनपोषण करुन मोठे करतात, त्यांना जीवनात अग्रेसर राहण्यासाठी समर्थ बनवतात व जीवनभर त्यांना आशिर्वाद देतात. आई-वडिल वृद्ध व असहाय झाल्यावर त्यांची सेवा करणे मुलांचे नैतिक कर्तव्य असते. जर त्यांनी नैतिक कर्तव्याचे पालन केले नाही तर ते अधर्माचे भागीदार होतात व समाजात त्यांची निंदा होते. बुद्ध याबाबतीत खुप संवेदनशील होते म्हणून त्यांनी व्यवस्था दिली की, व्यक्ती आपल्या आई-वडिलांच्या परवानगीशिवाय भिख्खुसंघात दीक्षा घेऊ शकत नाही. याचे तात्पर्य व्यक्ती आपल्या आई-वडिलांप्रती कर्तव्य सोडून भिक्खु बनू शकत नाही. बुद्धांने गृहस्थासाठी दिलेल्या तत्वात आई-वडिलांची सेवा प्रथम होती.प्राचीन भारतात आई-वडिलांची सेवा सर्वात मोठे मूल्य मानले जात होते. या मूल्याच्या प्रचार-प्रसारासाठी पुराण व बौद्ध जातक कथांमध्ये अनेक प्रसंग मिळतात, ज्याच्या माध्यमातून यास जास्त व्यावहारिक बनवले जाऊ शकेल. श्रवणकुमारची गोष्ट सर्वांना माहित आहे. येथे अनेक लोककथा व लोकगीतांमध्ये आई-वडिलांच्या सेवाचा उल्लेख करण्यात आला आहे. जातक कथांमध्ये असे अनेक संदर्भ मिळतात, ज्यात बोधिसत्वांनी आपल्या आई-वडिलांच्या सेवेत जीवनाची आहुती दिली होती. चुल्लनन्दिय जातकात बोधिसत्व हिमालयात नन्दिय वानर होते. त्यास छोटा भाऊ होता. ते दोघे ८० हजार वानरांचे नेतृत्व करत असल्यामुळे आपल्या आंधळ्या आईची सेवा पूर्ण वेळ करु शकत नव्हते म्हणून त्यांनी वानरांचे नेतृत्व सोडून पूर्ण वेळ आईची सेवा करण्यास सुरुवात केली.

## राशी भविष्य



**मेष :** शुभ रंग: काळा, शुभ दिशा: उत्तर कामाच्या ठिकाणी आपल्याला न आवडणारे काम मिळाल्यामुळे कामातील उत्साह कमी होईल.

**वृषभ :** शुभ रंग : गुलाबी, अनुकूल दिशा : दक्षिण महत्त्वाचे निर्णय, बैठका शक्यतो पुढे ढकला. कुटुंबियांसमवेत सिनेमा, नाटक पहाण्याचा बेत आखाल.

**मिथुन:** शुभ रंग : लाल, अनुकूल दिशा : पश्चिम परगावी जाण्याचे बेत व खाण्या-पिण्याची विविधता यामुळे वेळापत्रक बिघडणे शक्य. वेळोवेळी तज्ञांचा सल्ला घ्या.

**कर्क:** शुभ रंग : हिरवा, अनुकूल दिशा : दक्षिण मोठेपणाच्या नावाखाली होणारा खर्च अवाक्याबाहेर जाणार नाही याची काळजी घ्या. मुलांकडे दुर्लक्ष नको.

**सिंह:** शुभ रंग :लाल, शुभ दिशा : दक्षिण देवापुढे मागितलेले मागणे प्रत्यक्षात मिळण्याच्या शक्यता चांगल्याच वाढतील. मुलांच्या मागण्या पूर्ण करता येतील.

**कन्या:** शुभ रंग: निळा,शुभ दिशा: दक्षिण भावनिक नाती व्यवहारातही उपयोगी पडतील. यशाच्या शिखराकडे होणारी वाटचाल आपापल्या क्षेत्रात प्रसिद्धी देणारी ठरेल.

**तुळ :** शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा: उत्तर अनुभवी व्यक्तीबरोबर होणारी उठबस आपल्या ज्ञानात भर टाकेल. नवीन काही शिकल्याचे समाधान मिळेल.

**वृश्चिक:**शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:पूर्व कोणताही खर्च करताना 'अंथरूण पांघरून पाहून पाय पसरावे' हा सल्ला दिलेला महत्त्वाचा ठरेल.

**धनु:** शुभ रंग : काळा, अनुकूल दिशा : पूर्व विशेष आदर दाखवून केलेले हट्ट त्या त्या व्यक्तीकडून पुरविले जातील. कुमारिकांच्या विवाहाचा प्रश्न सुटेल.

मकर: शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा: पूर्व एखादा मोठा खर्च अनाठायी ठरणार नाही याची काळजी घ्या. कामात झालेला विलंब क्षम्य ठरणार नाही.

**कुंभ :** शुभ रंग : भूरकट, अनुकूल दिशा : पश्चिम कुटुंबात कलह, आजारपण, किरकोळ अपघात इ.मुळे त्रासदायक प्रसंग येणे शक्य. आरोग्य सांभाळा.

**मीन :** शुभ रंग : केसरी, अनुकूल दिशा : पूर्व शक्यतो ज्या निर्णयाचा दूरगामी परिणाम होणार आहे असे

## २ जून जन्मलेल्या लोकांचा भविष्य

स्वभाव : तुमच्या जन्मतारखेवर चंद्र, शुक्र, शनी व गुरूचा प्रभाव आहे. वादविवाद, संघर्ष तुम्हाला आवडत नाहीत. इतरांशी शक्यतो जुळवून घेण्याचा तुम्ही प्रयत्न करता. कलांचा आस्वाद घेणे तुम्हाला आवडते. पण त्यात तुम्ही फार वेळ घालवत नाही. तुमचा स्वभाव थोडासा गंभीर आहे. चेष्टामस्करीपेक्षा आपल्या कामात मग्न रहाण्याकडे तुमचा कल असतो. दूरदर्शीपणाने तुम्ही आपले ध्येय निश्चित करता. त्यानंतर अधिक परिश्रमाने, चिकाटीने साध्य केल्याखेरीज तुमच्या मनाला स्वस्थता लाभत नाही. एकलकोंडेपणा टाळा. इतरात मिसळा. शिस्तीचा जास्त अतिरेक केल्यास लोकप्रियता कमी होईल. काटकसरी वृत्तीची परिणती कंजूषपणात होऊ देऊ नका. पायाचे व्हेटिकोज वेन, सांधेदुखी असे विकार होतील. शीतपेये, आंबट पदार्थ यांचा जास्त वापर नको.

कार्यक्षेत्र : बाहेर भटकण्याचा दगदगीचा व्यवसाय वा नोकरी तुम्हास जमण्यासारखा नाही. कार्यालयातच निष्ठेने, प्रामाणिकपणे काम करण्याच्या वृत्तीने वरिष्ठांकडून कौतुक होईल. प्रशासकीय सेवेत प्रवेश मिळवण्यासाठी स्पर्धापरीक्षांची तयारी करा. पोलाद, खनिजे, सिमेंट, चामड्याच्या वस्तू यांच्या कंपन्यात लवकर प्रवेश मिळेल. हिशोब तपासनीस, धोरणविषयक सल्लागार म्हणून महत्वाच्या पदापर्यंत पोचू शकाल.

प्रणयी जीवन : जुन्या प्रथा, रूढी, एकनिष्ठता, पतिव्रत्य यासारख्या मूल्यांना तुम्ही जोडीदार निवडतांना महत्व देता. जीवनात ास्थिरस्थावर झाल्याखेरीज विवाह करू इच्छित नसल्याने काही चांगली स्थळे हातची जाण्याची शक्यता आहे. अत्याधुनिक विचारांची माणसे आवडत नाहीत. जानेवारी २० ते फेब्रुवारी १८ मधील व्यक्ती टाळा. सप्टेंबर २३ ते ऑक्टोबर २२ मधील व्यक्ती निवडा.

वर्षफळ : व्यवसायानिमित्त भरपूर प्रवास होतील. गुप्त शत्रूंचा सर्व शक्तीनिशी मुकाबला करावा लागेल. डिसेंबर जानेवारी मध्ये आलेला पैसा पुन: गुंतवावा लागेल. मार्च एप्रिल मध्ये नव्या जागेची खरेदी, सजावट होऊ शकेल. मे जून मध्ये कार्यालयात अस्थैर्याच्या समस्या जाणवतील. जुलै ऑगस्ट मध्ये भाऊबंदकीच्या प्रकरणांचा त्रास होईल. सप्टेंबर ऑक्टोबर मध्ये कार्यालयात प्रतिमा उजळ होईल.


महत्वाचे वर्ष : ८, १७, २६, ३५, ४४, ५३, ६२.

भाग्यरत्न : नीलम

याच तारेखेची व्यक्ती : वि. ना.


## बदक पालन व्यवसाय

बदक पालन व्यवसाय हा महाराष्ट्रातला एक उपेक्षित व्यवसाय आहे. महाराष्ट्रामध्ये सध्या कोंबडी पालनाचा व्यवसाय चांगल्यापैकी मूळ धरायला लागला आहे. परंतु बदक पालनाच्या बाबतीत अजून म्हणावी तेवढी जागृती निर्माण झालेली नाही. साधारणपणे दमट हवामानामध्ये हा व्यवसाय केला जातो. समुद्र किनार्?यालगत किंवा ज्या भागात भाताचे पीक जास्त होते अशा भरपूर पाऊस पडणार्?या भागामध्ये बदक पालन चांगले करता येते. म्हणजे कोकण हा भाग बदक पालनासाठी अनुकूल आहे. त्याचबरोबर चंद्रपूर आणि भंडारा या दोन जिल्ह्यातही बदक पालन करायला काही हरकत नाही. बदकाच्या पालनात कोंबडी पालनापेक्षा काही जास्त ङ्गायदे आहेत. पहिली गोष्ट म्हणजे बदकांना कोंबडीपेक्षा कमी खाद्य लागते. बदकाचे पालन पिंजर्?यात न करता साचलेल्या किंवा साचवलेल्या पाण्यात केले जात असल्यामुळे त्यांना पाण्यातच बरेचसे खाद्य सापडते. कोंबडीपेक्षा बदकांची रोगप्रतिकारक शक्ती जास्त असते आणि बदकांची अंडी देण्याची क्षमताही जास्त असते. बदकाची मादी कोंबडीपेक्षा वर्षाला ४० ते ५० जास्त अंडी देतात, शिवाय बदकाचे अंडे कोंबडीच्या अंड्यापेक्षा १५ ते २० ग्रॅम जास्त वजनदार असते आणि त्यामध्ये कोंबडीच्या अंड्यापेक्षा अधिक पोषक द्रव्ये असतात. कोंबडीच्या आयुष्यामध्ये अंडी द्यायला सुरुवात केल्यानंतर दुसर्?या वर्षी अंडी कमी व्हायला लागतात. परंतु बदकांच्या बाबतीत मात्र तसे होत नाही. बदक पालन करण्यासाठी पिंजरा किंवा जाळीच्या कुंपणाचे घर करावे लागतेच, परंतु बदकांना दिवसभर ङ्गिरायला जवळपास जलाशय असावा. नदी, नाला, छोटे तलाव किंवा सरोवर असल्यास त्यांच्या ङ्गिरण्याची आयतीच सोय होते. अशी कसलीही सोय नसताना बदल पालन करायचे असेल तर कृत्रिम जलाशय तयार करावा लागतो. असा जलाशय सहा ङ्गूट व्यासाचा आणि सव्वा ङ्गूट खोलीचा असावा. त्यात बदकांना ङ्गिरता येते. बदकांना सरोवर किंवा जलाशय केवळ ङ्गिरण्यासाठी हवा नसतो, तर त्याला त्या पाण्यात डोके बुडवता आले पाहिजे. तेवढी त्या पाण्याची खोली असली पाहिजे.त्या जलाशयाचा आकार पाळावयाच्या बदकांच्या संख्येनुसार ठरवावा. तसेच घरांचा आणि जाळीच्या कुंपणाने बंद केलेल्या घरट्याचा आकार ठरवताना सुद्धा तो बदकाच्या संख्येनुसार असावा. बदक पालनाचे सगळ्यात मोठे पथ्य म्हणजे नियमित पाणी पुरवठा, हिरवे गवत यांची उपलब्धता असावी. बदकांच्या पिलांचे संगोपन काळजीपूर्वक करावे लागते. त्यांच्या वाढीच्या काळामध्ये काही विशिष्ट तपमान असणे आवश्यक असते. पहिल्या महिन्यामध्ये ते २८ ते ३२ अंश सेल्सियस असावे. नंतरच्या काळात ते हळु हळु कमी केले तरी चालते.



## उपदेशकथा


स्नानसंध्या, पूजा-अर्चा यात कधी कसूर करत नसत त्यामुळे होई काय, आगगाडी वेळेवर पकडण्याचे 'पातक' त्यांच्याकडून होत नसे! एकदा मालवीयजी धापा टाकीत स्थानकावर पोहचले नि गाडी सुटणार एवढ्यात कसाबसा त्यांनी डबा गाठला पण तिकिट काढायचे गडबडीत राहून गेले. अलाहाबाद या स्थानकावर उतरून त्यांनी तिकिट तपासनिसांना आपली अडचण सांगितली. त्याने सांगितले, 'आम्ही तुम्हाला ओळखतो. तुम्ही खुशाल बाहेर पडा !' पण या गोष्टीला त्यांची सदसद्विवेकबुद्धी राजी होईना. ते म्हणाले, 'तुम्ही माझ्याकडून तिकिटाचे पैसे घ्या' तपासनीस



## पं. मदनमोहन मालवीय हे काशीचे कर्मठ ब्राह्मण.

म्हणाला, 'तुम्हाला मग भुर्दंडही भरावा लागेल!' त्यालाही मालवायजी तयार नव्हते. शेवटी त्यांनी चिरंजीवांना तिकिट खिडकीवर पाठवून अलाहाबाद ते बनारसचे तिकिट आणवले नि तपासनिसांसमोर त्याचे तुकडे केले व मगच ते बाहेर पडले! कथा उपदेश : फुकट प्रवास करू नये.

## श्रीसिद्धान्तशिखामणी -अमृतधारा




### निर्भावागमस्थल

अविशुद्धे विशुद्धे वा स्थले
दीप्तिर्यथा रवेः।
पतत्येवं सदाद्वैती सर्वत्र
समवृत्तिमान्।।४९।।

भावार्थ : सूर्याचा प्रकाश विशुद्ध अथवा अशुद्ध स्थलावर जसा समानतेने पडतो, तशाप्रकारे हा शिवाद्वैती सर्व ठिकाणी समान बुद्धी ठेवून संसार करीत असतो. अर्थात् स्तुती अथवा निंदा त्याच्या दृष्टीने समान असते.।।४९।।

## मनोरंजक महाशब्दकोडे



**आडवे शब्द**

१. रवळ
४. पांडुरंगाचे हात अशा स्थितीत आहेत
७. घराण्याची प्रथा
११. मोजणी
१३. संसदेचा सदस्य
१५. मनाचे ेक लिहिणारे संत
१७. सैन्याचा दाणागोटा
१९. शीखांचे संबोधन
२०. आकाश
२१. बोटाच्या टोकावरील कडक आवरण
२२. गजऱ्यातील सुगंधी वनस्पती
२४. कमी बोलणारा
२५. तृप्त न होणारी भूक
२७. झाडाभोवतीचा कट्टा
२८. डोळे
३०. दक्ष
३२. पैशाचा ढीग
३३. डावा
३५. सज्जन, प्रामाणिक
३६. शंकर (हिंदी)
३८. तेजस्वी, राजबिंडा
४०. बेडकांचे ओरडणे
४३. रक्षण करणारा
४५. जामीन (हिंदी)
४७. डोक्याला थंडावा देणारी व केसांची वृद्धी करणारी सुगंधी वनस्पती
५०. अर्धी ओंजळ
५२. माणूसकी
५९. लोकांसमोर न घाबरता बोलणारा
६०. नवरा
६१. कोशिंबिरीचे फळ
६३. पवित्र
६५. आवरण
६६. तेज, कांती
६८. बटवडा, वितरण
७०. रक्त देणे
७३. -- -- धन म्हणजे सर्वस्व
७४. क्वचित
७७. प्रेरणा, गती
७८. शहर, मोठे गाव
८०. देवाण-घेवाण
८३. रहित, बाद
८४. अटीची भाषा
८५. वेडावाकडा

**उभे शब्द**

१. खबदाड
२. श्रीकृष्णाचे एक नाव
३. मातीचा कण
४. गुणज्ञ
५. कोठार, गोदाम
६. फळातील द्रव
७. पंख
८. पराजय
९. कबीराचे देव
१०. हास्याचे पीक
१२. सेवक
१४. संत रामदासांनी लिहिलेला ग्रंथ
१६. राक्षस
१८. एकरुप
२३. दुर्भिक्ष्य, चणचण
२४. सेपे नसलेले
२६. शंकराचे एक नाव
२७. सीमा, मर्यादा
२९. मृत्यूचा राजा
३१. फुरसत
३४. डाळीचे पीठ
३५. धनको, कर्ज देणारा
३७. तीनपट
३९. हिशोबाची एक बाजू
४१. मुंबईचा घरगडी
४२. अत्यंत तिखट मसालेभात
४४. माफी मागणारा
४६. तापविणारा सूर्य
४८. संध्याकाळ
४९. पाणी व जमीन दोन्हीकडे वास्तव्य करणारे प्राणी उदा. कासव, मगर इ.
५१. हळू, संथ
५३. चामखीळ
५४. कहाणीतील गाव
५६. त्रिगुणांतील दुसरा- सत्व -- तम
५७. सन्मानाची रक्कम
५८. दही घुसळून केलेले पेय
६२. कोवळा अंकुर
६४. बशीचा जोडीदार
६७. वेदना, त्रास
६८. बुटका बटु
६९. विसरभोळा
७१. वैरी, खटला दाखल करणारा
७२. अकस्मात
७५. शिकार७६. ब्राह्मण
७९. भुक्कड
८०. बाहेरच्या विरुद्ध

# राजमाता अहिल्याबाईनी अध्यात्माचा आधार घेत लोकांना एकत्रित केले - डॉ.बळीराम पांडे



उदगीर (प्रतिनिधी) राजमाता अहिल्याबाईनी अध्यात्माचा आधार घेत लोकांना एकत्रित केले असे प्रतिपादन विचारवंत डॉ. बळीराम पांडे यांनी केले.ते छत्रपती संभाजी नगर येथील सुंदरवाडी झाल्टा येथील रुक्मिणी मंदिरात समस्त गावकरी व धनगर समाज एकता मंच यांच्या वतीने आयोजित जयंती उत्सवात बोलत होते.

पुढे बोलताना डॉ. पांडे म्हणाले की, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांनी केलेले कार्य हे सर्वव्यापी स्वरूपाचे आहे. त्यांचा विचार कोणत्या एका वर्ण, वर्ग, जाती, धर्म, पंथासाठी नव्हता. प्रत्येक माणसाला सन्मानाने आणि सुखाने जगण्याचा हक्क आहे तो त्यांना मिळत नसेल तर तो मिळून देण्यासाठी त्यांना मदत करणे हे आपलं कर्तव्य आहे ही भावना त्या काळात मातेच्या मनात दृढ होती, त्यांचा दृष्टिकोन हा मानवतावादी होता. त्यांच्या अंगी भूतदया ओतपोत भरलेले होती. पक्षांचाही विचार त्यांनी केला.पक्षांना धान्य खाण्याची सोय व्हावी म्हणून स्वतंत्र शेती राखून ठेवली.

अन्नदान करण्यावर त्यांचा विशेष भर होता. त्यांच्यामुळे गरिबांना मोफत जेवण मिळे. सणावारी त्यांना गोडधोड वाढले जाई. पाण्याची सोय व्हावी म्हणून त्यांनी जागोजागी पाणपोया सुरू केल्या. जलकुंड बांधले शिवाय जलाशयाची निर्मिती केली. त्याचबरोबर घाट, मंदिरे, कलाशिल्पे, धर्मशाळा बांधल्या. अनेक लोकोपयोगी कामे केली.मिळणाऱ्या उत्पन्नातून एक छदाम स्वतःसाठी न वापरता त्यांनी तो पैसा लोक कल्याणासाठी वापरला. त्यांनी लोकांच्या कलेला, उद्योगाला वाव मिळून बेकारी नाहीशी व्हावी म्हणून लोकोपयोगी व चिरकाल टिकणारी कामे केली . त्यांच्या समोर येणाऱ्या संकटांना त्या सहनशीलतेने सामोऱ्या गेल्या. त्यांनी आध्यात्मिक अंगाचा आधार घेऊन, जागोजागी मंदिरांची निर्मिती करून लोकांना एकत्रित केले, परमेश्वरचरणी आढळ ठेवले होते, देवभक्ती करत असताना त्यांनी आपल्या कर्तव्यावर ठाम होत्या, त्रिकाल स्नान, नित्य पूजापाठ, नेहमीप्रमाणेच पुराण व कीर्तन श्रवण चालू होते, त्यात त्यांनी आपल्या कामात कधीच खंड पडू दिला नाही. म मओम नमः शिवाय म आणि कुलदैवत मल्हारी मार्तंड यांच्या नामाचा जप त्यांच्या मुखातून सतत चालू होता. ईश्वराने जे उत्तरदायित्व सोपवलेले आहे ते पार पाडणे माझे कर्तव्य, केलेल्या कार्याचा लेखाजोखा परमेश्वरापुढे द्यावे लागेल अशी त्यांची धारणा होती.

संतांच्या विचारांचा व शिवाजी महाराजांच्या स्वराज्य विचाराचा वारसा त्यांनी पुढे चालवला. जगातील प्रत्येक व्यक्तीला विचार करायला लावणारी राजयोगिनी पुन्हा होणे नाही.

असे विचार देवगिरी महाविद्यालयातील विचारवंत प्रा. डॉ.बळीराम पांडे पुढे असे म्हणाले की, जर गौतमाबाई सारखी सासू मिळाली नसती, सुशीला बाई सारखी आई मिळाली नसती तर संस्काराच विद्यापीठ नसतं मग खऱ्या अर्थाने आईल्याबाई घडल्या असत्या का? म्हणून उद्याची राजमाता अहिल्याबाई तुमच्या घराघरात घडवायचं असेल तर लेकीला शिक्षण व संस्कार देणारी सुशिलाबाई दक्ष व पराक्रम शिकवणारी सासू गौतमाबाई निर्माण होणे काळाची गरज आहे यांनी अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीच्या निमित्ताने विचार मांडले. सुंदर वाडी झाल्टा येथील रुक्मिणी मंदिरात समस्त गावकरी व धनगर समाज एकता मंच यांच्या वतीने आयोजित जयंती उत्सवाच्या कार्यक्रमात डॉ. पांडे बोलत होते अध्यक्षस्थानी माननीय प्राचार्य एस पी जवळकर हे होते .तर मुकुंद भाऊ शिंदे, अशोक नाबदे, बद्री शेठ शिंदे, रमेश पवार, प्रा. राघोजी पुंडगे, प्रा. सुभाष गुंजगळे, अविनाश एकुर्के, संजू भाऊ शिंदे, रामेश्वर कोरडे, ज्ञानेश्वर शिंदे, अण्णा भाऊ मगरे, संतोष कोल्हे, मयूर पंचदाने, सूर्यकांत सूर्यवंशी, प्रकाश खजिनकर, खेडकर सर, अभिषेक बडे, अमोल बेळगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. देविदास पडूळ यांनी केले .कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती कविता रगडे यांनी केले. कार्यक्रमाचे आभार प्रमोद कोल्हे यांनी मानले. या कार्यक्रमाला समस्त गावकरी मंडळी व धनगर समाजाचे बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भाजपा यूवा मोर्चाच्या वतीने आ.जितेंद्र आव्हाड यांचा निषेध



उदगीर (प्रतिनिधी) राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यानी भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर याचा फोटो फाडलाच्या निषेर्धाथ *भाजपा प्रदेश सोशल मीडिया प्रमुख प्रकाश दादा गाडे, भारतीय जनता युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष अमोल भैया निडवदे यांच्या नेतृत्वात जितेंद्र आव्हाडच्या प्रतिमेला जोडे मारो आंदोलन करण्यात आले यावेळी भाजपा युवा नेते समीर भैया परगे, युवा मोर्चा शहरध्यक्ष रामेश्वर चांडेश्वरे, अनुसूचित मोर्चा शहरध्यक्ष विरलाल कांबळे, युवा मोर्चा जिल्हाप्रसिद्धी प्रसाद नाईकवाडे, युवा मोर्चा जिल्हा सचिव महादेव पाटील, जिल्हा उपाध्यक्ष अपासाहेब मुसने, जिल्हा सचिव संदीप पांढरे आदी युवा मोर्चाचे पदाधिकारी उपस्थिती होते..छत्रपती शिवाजी महाराज चौक,उदगीर येथे आव्हाडच्या फोटो ला चपला मारून निषेध करण्यात आला...

***तापमान***
*दि.३१/०५/२०२४
कमाल तापमान-४०.५ से.
किमान तापमान३१.५से
*आर्द्रता - ३२%*
*शरिर क्रिया विभाग
पशुवैद्दकिय उदगीर

**टी.सी हरवली आहे**

माझी प्रियंका बालाजी पांचारे या नावाची इयत्ता डी. एड् कॉलेज मुक्रामाबाद येथील द्वितीय वर्षाची मुळ टि.सी. व इतर महत्वाची कागदपत्र मुक्रामाबाद ते उदगीर बसने प्रवास करत असताना हरवले आहेत.

जर कोणास सापडल्यास संपर्क :
मो. नं. ९४२०२९२५७३

## साने गुरूजी विद्यालय शाळेतून १० परिक्षेत गुंजन नावंदर सर्वप्रथम





उदगीर (प्रतिनिधी) उदागिर येथील होकारना रहिवासी असलेले दयानंद नावंदर यांची मुलगी पहिली पासूनच कोणताही विषयाचे टिवीशन नसताना ९४.८० टक्के गुण घेवून साने गुरूजी विद्यालयातून सर्व प्रथम आली आहे दुतिय क्रमांक कुमारी सुचिता ,कांडेकर ही ९३.८० टक्के गुण व तृतीय क्रमांक कुमारी किरण श्याम मोदाणी ही ९३.४० टक्के घेवून उत्तीर्ण झाले आहेत व शाळेचा निकाल १०० टक्के असून संस्था अध्यक्ष देवप्रिय डोळे व सचिव मनोज दादा पुदाले व शाळेतील मुख्याध्यापक व सर्व शिक्षिका तर्फे सर्व मुलांचे अभिनंदन करून पुढील शिक्षणासाठी हार्दीक शुभेच्छा दिले.

## स्व.गंगाधर सुपारे यांच्या स्मरणार्थ रुग्णालयात खिचडी वाटप



उदगीर (प्रतिनिधी) जीवन प्रयाग फाउंडेशनच्या वतीने स्व. गंगाधर सुपारे यांच्या स्मरणार्थ उपजिल्हा रूग्णालय, उदगीर येथे खिचडी वाटप करण्यात आले.

आपली सामाजिक जबाबदारी लक्षात घेता समाजातील प्रत्येक व्यक्तीचे व्यक्तिपरत्वे आपण काहीतरी देणे लागतो हेच देणे आणि त्याची कृतज्ञता लक्षात घेऊन स्व.गंगाधर सुपारे यांच्या पुण्यतिथी निमित उपजिल्हा रुग्णालयात रुग्णाचे नातेवाईक,कर्मचारी, सुरक्षा रक्षक यांना खिचडी वाटप करण्यात आले.

जीवन प्रयाग फाऊंडेशन ही सामाजिक संस्था नेहमीच समाजाचे गांभीर्य ठेवून वावरत असते आणि समाजाप्रती असलेला आदरभाव जपत असते. विविध कार्यक्रमाच्या माध्यमातून ही संस्था आणि संस्थेचे पदाधिकारी समाजकार्य करण्यासाठी नेहमीच तत्पर असतात.यावेळी जीवन प्रयागफाऊंडेशनचे अध्यक्ष प्रभात सूर्यवंशी,राजेश्री सुपारे,नितीश शिरशे,शुभम सुपारे,विश्रुत सुपारे व अन्य कार्यकर्ते उपस्थित होते.

### तालूका दंडाधिकारी तथा तहसिलदार उदगीर यांचे कार्यालय

(दंडणिय विभाग)

जा.क्र. २०२४/एमएजी/कावि दि.१७/०५/२०२४

जाहीरनामा

ज्याअर्थी अर्जदार नेहा अर्शीन आजीमोद्यीन शेख रा. बनशेळकी रोड उदगीर ता.उदगीर जन्म दिनांक ०२/१०/२००० रोजी मौजे उदगीर ता. उदगीर येथे झाला असून जन्म नोंदवहीला त्यांची जन्म नोंद करण्यात आलेली नाही. सदरील अर्जदार नेहा अर्शीन आजीमोद्यीन शेख रा. बनशेळकी रोड उदगीर ता.उदगीर जन्म दिनांक ०२/१०/२००० रोजीची नोंद जन्म नोंदवहीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करणे बाबत या न्यायालयात दिनांक २६/०४/२०२४ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी अर्जदार यांचा जन्म दिनांक ०२/१०/२००० रोजी झाले बाबत कोणास आक्षेप असेल तर हया जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिण्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपले म्हणने दाखल करावे. सदरील मुदतीत कोणी म्हनणे दाखल केले नाही तर न्यायालय सदरहू अर्जदार नेहा अर्शीन आजीमोद्यीन शेख रा. बनशेळकी रोड उदगीर ता.उदगीर जन्म दिनांक ०२/१०/२००० रोजीची नोंद ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय बनशेळकी रोड ता.उदगीर येथे जन्म नोंदवहीला नोंद घेणे बाबत संबंधितास आदेशीत करण्यात येईल.

आज दिनांक १७/०५/२०२४ रोजी दिले.
पूढे नेमलेली तारीख १८/०६/२०२४

तालूका दंडाधिकारी तथा,
तहसीलदार उदगीर

### तालूका दंडाधिकारी तथा तहसिलदार उदगीर यांचे कार्यालय

(दंडणिय विभाग)

जा.क्र. २०२४/एमएजी/कावि दि.१७/०५/२०२४

जाहीरनामा

ज्याअर्थी अर्जदार प्रकाश आप्पाराव शेल्हाळे रा. शेकापुर ता.उदगीर जन्म दिनांक ०१/०६/१९७७ रोजी मौजे शेकापुर ता. उदगीर येथे झाला असून जन्म नोंदवहीला त्यांची जन्म नोंद करण्यात आलेली नाही. सदरील अर्जदार प्रकाश आप्पाराव शेल्हाळे रा. शेकापूर यांनी त्यांचा जन्म दिनांक ०१/०६/१९७७ रोजीची नोंद जन्म नोंदवहीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करणे बाबत या न्यायालयात दिनांक १३/०५/२०२४ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी अर्जदार यांचा जन्म दिनांक ०१/०६/१९७७ रोजी झाले बाबत कोणास आक्षेप असेल तर हया जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिण्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपले म्हणने दाखल करावे. सदरील मुदतीत कोणी म्हनणे दाखल केले नाही तर न्यायालय सदरहू अर्जदार प्रकाश आप्पाराव शेल्हाळे रा. शेकापुर ता.उदगीर जन्म दिनांक ०१/०६/१९७७ रोजीची नोंद ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय शेकापुर ता.उदगीर येथे जन्म नोंदवहीला नोंद घेणे बाबत संबंधितास आदेशीत करण्यात येईल.

आज दिनांक १७/०५/२०२४ रोजी दिले.
पूढे नेमलेली तारीख १८/०६/२०२४

तालूका दंडाधिकारी तथा,
तहसीलदार उदगीर





उदगीर मनोरंजन

कल्पना 70MM A/C DOLBY
११:३०,२:३०,०५:३०,८:३०
दररोज ४ शो



उदयगिरी लॉयन्स धर्मादाय नेत्र रुग्णालय, उदगीर
उदय कॉलनीच्या पाठीमागे, लॉयन्स नगर, नांदेड नाका, उदगीर-४१३५१७ जि.लातूर
फोन नं. ०२३८५-२५५२४५,२९५२४५ मो. ९७१०२५५२४५

| वेळ सकाळी ०९ ते ५ | सर्व प्रकारची नेत्र सुविधा उपलब्ध | रविवार ९ ते १ | @24 hrs X 365 |
|---|---|---|---|

| १,५५,००० मोतिबिंदू शस्त्रक्रिया | ४५०० नेत्रतपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया |
|---|---|

मराठवाडयात एक अद्यावत नेत्र रुगणालय
भेट देणारे विषेतज्ञ डॉक्टर्स

| | | |
|---|---|---|
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. नविन कुमार राठोड (हैद्राबाद) (M.D.,V.R.F.) LVPEI | ३ रा रविवार |
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. विडेकर चेतन किशारे (नांदेड) (D.N.B.,V.R.F.) LVPEI | २ रा शनिवार |
| कॉर्नीया सर्जन | डॉ. ए.आर. नळगीरकर (औरंगाबाद) (M.S.) (Cornea) | २ रा शनिवार |
| नासुर तज्ञ | डॉ. सचिन चोले (M.S.) (Cornea) (बीड) डॉ. व्यंकटेश पोलावार (DORL) (उस्मानाबाद) | २ रा रविवार ४ था रविवार |
| काचबिंदू व बालरोग तज्ञ चिकित्सा | डॉ. श्री/सौ. शितल उदय नाईक | ४ था रविवार |

!! अंधमुलांसाठी अरुणा अभय ओसवाल रिसोर्स सेंटर !!
अंधत्व मुक्त अभियानांतर्गत सहभाग नोंदवा

डॉ. सौ. अर्चना पवार (M.S.) फेको तज्ञ — डॉ.अंकिता लाहोटी (DOMS) — डॉ. दिपाली पाटील (MS)
डॉ. शितल पेद्देवाड (M.S.) — डॉ. अपुर्वा लखोटे (MS, Ayur)

डॉ. आर.एन.लखोटिया अध्यक्ष — व समस्त लॉयन्स परिवार, उदगीर — लॉ. प्रदिप बेंद्रे सचिव



# लातूर येथील सैनिकी मुला-मुलींच्या वसतिगृहाची प्रवेश प्रक्रिया ३ जूनपासून सुरु

लातूर, / प्रतिनिधी- येथे आधुनिक पध्दतीच्या सर्व सोयी उपलब्ध असलेल्या सैनिकी मुला-मुलींच्या वसतिगृहात सन २०२४-२०२५ मध्ये शिक्षण घेणाऱ्या मुला-मुलींसाठी प्रवेश प्रक्रिया सुरु झाली आहे. प्रवेश घेण्यास इच्छुक मुला-मुलींसाठी ३ जून २०२४ पासून प्रवेश पुस्तिका वाटप सुरू करण्यात येणार आहे.

सर्व माजी व आजी सैनिकांच्या तसेच युध्द विधवा व माजी सैनिक विधवांच्या मुला-मुलींना पहिल्या टप्यात प्रवेश दिला जाणार आहे. तसेच पूर्ण शैक्षणिक वर्ष चालू असणारे व कमीत कमी दररोज ६ तासपेक्षा जास्त शिकवणी घेत असलेल्या खाजगी शिकवणी वर्गाच्या बोनाफाईडधारक माजी सैनिक, आजी सैनिक तसेच युध्द विधवा व माजी सैनिक विधवांच्या पाल्यांना दुसरा टप्यात प्रवेश देण्यात येणार आहे. प्रवेश प्रक्रियेत जागा पूर्ण भरल्या नसल्यास उर्वरित जागेसाठी संचालक, सैनिक कल्याण विभाग, पुणे यांच्या परवानगीने नागरी मुलां-मुलींना तिसरा टप्प्यात वसतिगृहात प्रवेश देण्यात येणार आहे.

वसतिगृहात उपलब्ध सुविधा

उत्तम भोजन व्यवस्था, राहण्याची उत्तम सोय, अभ्यास व वाचनालयाची सोय, मनोरंजन व्यवस्था, खेळासाठी प्रशस्त मैदान, गरम पाण्याची सोय, सी. एस. डी. कॅन्टीन व ईसीएचसीची सुविधा, सुरक्षेची योग्य सोय, २४ तास लाईट व पाण्याची सोय, शिस्तबंध व प्रसन्न वातावरण सकाळचा व्यायाम आदी सुविधा पुरविण्यात येतील.

भोजन आणि निवास भाडे

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून भोजन व निवास भाड्याचे प्रतिमाह नवीन दर निश्र्चित करण्यात आले आहेत. त्यामध्ये सेवारत सैनिकांचे पाल्य आणि नागरी पाल्यांसाठी निवास १ हजार ५००, भोजन २ हजार असे एकूण ३ हजार ५०० शुल्क आकारले जाईल. सेवारत जे.सी.ओ. यांच्या पाल्यांसाठी निवासाचे १ हजार रुपये आणि भोजनाचे २ हजार रुपये असे एकूण ३ हजार रुपये, तर सेवारत शिपाई अथवा एनसीओ यांच्या पाल्यांसाठी निवासाचे ८०० रुपये आणि भोजनाचे २ हजार रुपये असे एकूण २ हजार ८०० रुपये दरमहा शुल्क आकारले जाईल. माजी सैनिक अधिकारी यांच्या पाल्यांसाठी निवासाचे १ हजार रुपये, भोजनाचे २ हजार रुपये असे एकूण ३ हजार रुपये, माजी सैनिक जे.सी.ओ. यांच्या पाल्यांसाठी निवासाचे ८०० रुपये आणि भोजनाचे २ हजार रुपये असे एकूण २ हजार ८०० रुपये दरमहा शुल्क आकारले जाईल. तसेच माजी सैनिक शिपाई, एनसीओ यांच्या पाल्यांसाठी ५०० रुपये निवास आणि २ हजार रुपये भोजन असे एकूण २ हजार ५०० रुपये दरमहा शुल्क आकारले जाईल. युद्ध विधवा व माजी सैनिक विधवा यांच्या पाल्यांना राहण्याची व भोजनाची व्यवस्था निशुल्क राहील.

प्रवेश प्रक्रिया वसतिगृह प्रवेश पुस्तिकेतील नियम व अटीप्रमाणे नमूद प्राधान्यक्रमाने होईल. अधिक माहितीसाठी लातूर शहरातील अंबाजोगाई रोडवरील मेडिकल कॉलेजसमोरील सैनिक संकुल येथील सैनिकी मुला-मुलींच्या वसतिगृहाचे अधीक्षक, अधीक्षिका यांच्याशी किंवा ०२३८२-२२८५४४ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल शरद प्रकाश पांढरे (नि.) यांनी केले आहे.



उत्तर प्रदेशातील चेतगंज येथील मतदान केंद्रावर मतदान केल्यानंतर अमिट शाईचे चिन्ह दाखवताना मतदार.

# दिवा स्थानकात रेल्वेचा दरवाजा फोडण्याचा प्रयत्न

मुंबई १ – मध्य रेल्वेच्या ६३ तासांच्या मेगाब्लॉकला अद्यापही काही तास उरले आहेत. अद्यापही मेगाब्लॉक पूर्ण झाला नसला तरीही प्रवाशांची संख्या मात्र कमी होत नसल्यामुळं वाहतुकीच्या इतर साधनांवर याचा ताण येताना दिसत आहे. काही प्रवाशांना अपेक्षित स्थळी पोहोचण्यासाठी रेल्वेव्यतिरिक्त इतर पर्याय नसल्यामुळं खोळंबा अपेक्षित असतानाही अनेकांनी रेल्वे स्थानकाची वाट धरली. काहींना या ब्लॉकची कल्पना नसल्यामुळं अशा प्रवाशांचाही या परिस्थितीमुळं खोळंबा होताना दिसत आहे. मध्य रेल्वेच्या या ब्लॉकमुळं सध्या ठाणे आणि त्यापुढील स्थानकांवर प्रचंड गोंधळाची स्थिती पाहायला मिळत आहे. शनिवारी सकाळच्याच वेळी दिवा स्थानकाच तुडूंब गर्दी पाहायला मिळाली. दिवा स्थानकातून मुंबईच्या दिशेनं जाणाऱ्या लोकलमध्ये ही गर्दी पाहायला मिळाली. इथं गर्दी असल्यामुळं रेल्वेचा दरवाजा बंद करण्यात आला होता, पण प्रवाशांनी हा दरवाजा तोडण्याचा प्रयत्न केला.

# नाशिककरांनो सावधान! स्वाईन फ्लूमुळे दोघांचा मृत्यू, आतापर्यंत आठ जण दगावले, मनपा अलर्ट मोडवर

नाशिक १ – स्वाईन फ्लूमध्ये नाशिककरांची चिंता वाढली आहे. नाशिकमध्ये स्वाईन फ्लूमुळे दोघांचा बळी गेल्याची धक्कादायक माहिती समोर येत आहे. मृतांमध्ये शहरातील ५० वर्षीय पुरूष तर दिंडोरीतील ४२ वर्षीय महिलेचा समावेश आहे. यामुळे नाशिकमधील स्वाईन फ्लू बळींची संख्या आठवर गेली असून आतापर्यंत शहरातील २८ जणांना स्वाईन फ्लूची लागण झाली आहे. नाशिक शहरात स्वाईन फ्लूच्या रुग्णांमध्ये झपाट्याने वाढ होत असल्याने महापालिका प्रशासन खडबडून जागी झाली आहे.

गेल्याच आठवड्यात नाशिकमधील जेलरोड भागातील ५८ वर्षीय सेवानिवृत्त एअरफोर्स कर्मचाऱ्याचा मृत्यू झाला आहे. या रुग्णावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू होते. मृत्यूनंतर रुग्णाचा तपासणी अहवाल पॉझिटीव्ह आला आहे. दिंडोरीतील ४२ वर्षीय महिलेला स्वाईन फ्लूची लागण झाल्याने नाशिकमधील खासगी रुग्णालयात उपचार सुरू असताना तिचे निधन झाले.

आतापर्यंत आठ जण दगावले

दरम्यान, जानेवारी ते एप्रिल या चार महिन्यात शहरात स्वाईन फ्लूचे २३ बाधित रुग्ण आढळून आले होते. एप्रिलमध्ये जेलरोड येथील ५९ वर्षीय डॉक्टरचा या आजारामुळे मृत्यू झाल्याने या आजाराचे गांभीर्य वाढले. त्यानंतर मे महिन्यात सिन्नर मधील दातली गाव येथील एका ६३ वर्षीय महिला, मालेगाव येथील ६५ वर्षीय व्यक्ती आणि २९ वर्षीय महिला, निफाड येथील ६८ वर्षीय महिला तर कोपरगाव येथील ६५ वर्षीय महिलेचा नाशिकमध्ये उपचारा दरम्यान मृत्यू झाला होता. आता नाशिकमधील स्वाईन फ्लूने मृत्यू झालेल्यांची संख्या आठवर पोहोचली आहे. यामुळे मनपा प्रशासन अलर्ट मोडवर आली असून इतर स्वाईन फ्लूच्या रुग्णांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती महापालिकेच्या आरोग्य विभागाने दिली आहे.

नेमका कशामुळे होतो स्वाईन फ्लू?

स्वाईन फ्लू, ज्याला स्वाईन इन्फ्लूएन्झा असेही म्हणतात, त्याचा परिणाम डुकरांमध्ये तीव्र श्वसन रोग झाला, जो नंतर मानवांमध्ये फ्लूचा प्रकार, ए इन्फ्लूएंझा व्हायरसमध्ये विकसित झाला.

स्वाईन फ्लूच्या विषाणूचा मानवांमध्ये प्रसार होण्याचा प्रमुख मार्ग म्हणजे जेव्हा संक्रमित व्यक्ती शिंकतो किंवा खोकतो.

जेव्हा एखादी व्यक्ती विषाणूने संक्रमित झालेल्या एखाद्या गोष्टीला स्पर्श करते किंवा संपर्क करते किंवा संक्रमित झालेल्या व्यक्तीच्या नाक, तोंड आणि आसपासच्या भागांना स्पर्श करते तेव्हा विषाणूचा संसर्ग होतो. स्वाईन फ्लू हा आजाराच्या पहिल्या पाच दिवसात संसर्गजन्य असतो. लहान मुले आणि वृद्धांमध्ये हे प्रमाण वाढू शकते. त्यामुळे लक्षणे आढळल्यास त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्या.

## जाहीरनामा

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार चाकूर, यांचे कार्यालय (दंडणीय विभाग)**

**जा.क. २०२४/एमएजी/कावि दि.३०.०७/२०२४**

**अर्जदार :– धानुरे माहीन सिद्दीक**

**विरूध्द**

**गैरअर्जदार मुख्याधिकारी नगर पंचायत / ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कार्यालय, आटोळा**

कोर्टाचा शिक्का

**अर्ज :– कलम १३(३)**

**जन्म–मृत्यु नोंदणी कायदा.**

याव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार श्री. धानुरे माहीन सिद्दीक रा. आटोळा ता. चाकुर जि. लातुर यांनी १३ (३) जन्म–मृत्यु कायदा अंतर्गत अर्जदार यांचा स्वता चा जन्म दि. ११/११/२००१ रोजी राहत्या घरी आला आसुन मुख्याधिकारी नगर पंचायत / ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कार्यालय आटोळा ता. चाकुर जि. लातुर येथे जन्म नोंद नसल्याने तीच्या जन्म तारखेची नोंदनी मुख्याधिकारी नगर पंचायत/ ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कार्यालय आटोळा ता. चाकुर जि. लातुर येथे करणे कामी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर जन्म तारखेच्या नोंदणीसाठी कोणाच्याही कुठल्याही प्रकारचे आक्षेप अथवा हरकती असल्यास त्यानी हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात सादर कराव्यात. सदर कार्यालयामध्ये कोनाच्याही आक्षेप अथवा हरकती प्राप्त न झाल्यास हे न्यायालय योग्य तो आदेश पारीत करेल. मुदतीनंर प्राप्त झालेल्या आक्षेपांचा अथवा हरकतीचा विचार करण्यात येणार नाही.

दि.३०/ ५/ २०२४, पुढील तारीख ०२/०७/२०२४

**आदेशावरून**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार, तहसील कार्यालय, चाकुर**

## जाहीरनामा

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार चाकूर, यांचे कार्यालय (दंडणीय विभाग)**

**जा.क्र. २०२४/एमएजी/कावि**

**दि.२०/९/ २०२४**

**अर्जदार :– धानुरे हिना फिरोज**

**विरूध्द**

**गैरअर्जदार :– मुख्याधिकारी नगर पंचायत / ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कार्यालय, आटोळा**

कोर्टाचा शिक्का

**अर्ज :– कलम १३(३) जन्म–मृत्यु नोंदणी कायदा.**

याव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार श्री. धानुरे हिना फिरोज रा. आटोळा ता. चाकुर जि. लातुर यांनी १३ (३) जन्म–मृत्यु कायदा अंतर्गत अर्जदार यांचा स्वता चा जन्म दि. ०८/०६/२००२ रोजी राहत्या घरी झाला आसुन मुख्याधिकारी नगर पंचायत / ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कार्यालय आटोळा ता. चाकुर जि. लातुर येथे जन्म नोंद नसल्याने तीच्या जन्म तारखेची नोंदनी मुख्याधिकारी नगर पंचायत / ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कार्यालय आटोळा ता. चाकुर जि. लातुर येथे करणे कामी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर जन्म तारखेच्या नोंदणीसाठी कोणाच्याही कुठल्याही प्रकारचे आक्षेप अथवा हरकती असल्यास त्यानी हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात सादर कराव्यात. सदर कार्यालयामध्ये कोनाच्याही आक्षेप अथवा हरकती प्राप्त न झाल्यास हे न्यायालय योग्य तो आदेश पारीत करेल. मुदतीनंर प्राप्त झालेल्या आक्षेपांचा अथवा हरकतीचा विचार करण्यात येणार नाही.

दि३०/८/ २०२४, पुढील तारीख २/ ७ / २०२४

**आदेशावरून**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार, तहसील कार्यालय, चाकुर**

## जाहीरनामा

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार चाकूर, यांचे कार्यालय (दंडणीय विभाग)**

जा.क्र. २०२४/एमएजी/कावि दि.३०/५७ २०२४

अर्जदार :– श्री. धानुरे जमीरआमिनोद्दीन

विरुध्द

**गैरअर्जदार :– मुख्याधिकारी नगर पंचायत / ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कार्यालय, आटोळा**

कोर्टाचा शिक्का

**अर्ज :– कलम १३(३) जन्म–मृत्यु नोंदणी कायदा.**

याव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार थी. धानुरे जमीरआमिनोद्दीन रा. आटोळा ता. चाकुर जि. लातुर यांनी १३ (३) जन्म–मृत्यु कायदा अंतर्गत अर्जदार यांचा स्वता चा जन्म दि. ०२/१०/१९७८ रोजी राहत्या घरी झाला आसुन मुख्याधिकारी नगर पंचायत / ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कार्यालय आटोळा ता. चाकुर जि. लातुर येथे जन्म नोंद नसल्याने तीच्या जन्म तारखेची नोंदनी मुख्याधिकारी नगर पंचायत / ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कार्यालय आटोळा ता. चाकुर जि. लातुर येथे करणे कामी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर जन्म तारखेच्या नोंदणीसाठी कोणाच्याही कुठल्याही प्रकारचे आक्षेप अथवा हरकती असल्यास त्यानी हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात सादर कराव्यात. सदर कार्यालयामध्ये कोनाच्याही आक्षेप अथवा हरकती प्राप्त न झाल्यास हे न्यायालय योग्य तो आदेश पारीत करेल. मुदतीनंर प्राप्त झालेल्या आक्षेपांचा अथवा हरकतीचा विचार करण्यात येणार नाही.


दि.३०/८/ २०२४, पुढील तारीख २/ ७ / २०२४

**आदेशावरून**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार, तहसील कार्यालय, चाकुर**

# ५ जूनला केंद्रीय मंत्रिमंडळाला राष्ट्रपतींकडून डिनरचे निमंत्रण

नवी दिल्ली : लोकसभा निवडणुकीचा निकाल ४ जून रोजी लागणार आहे. यानंतर लगेचच ५ जून रोजी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू या केंद्रीय मंत्रिमंडळाला फेअरवेल डिनर देणार आहेत. याचे आयोजन रात्री ८ वाजता केले जाणार आहे. १६ जूनला १७ व्या लोकसभेचा कार्यकाळ संपत आहे. त्यापूर्वीच नवीन सरकार स्थापन करण्यात येणार आहे.



प्रत्येक लोकसभेच्या कार्यकाळाच्या समाप्तीनंतर राष्ट्रपतींकडून मंत्रिमंडळाचा निरोप समारंभ आयोजित करण्यात येतो. यावेळी ५ जूनला याचे आयोजन करण्यात आले आहे. लोकसभा निवडणुकीचा आज सातवा टप्पा पार पडत आहे. थोड्याच वेळात मतदान संपणार आहे. यानंतर सर्वांना निकालाची उत्सुकता लागून राहणार आहे. सुमारे अडीज महिने चाललेल्या या लोकशाहीच्या कुंभमेळ्यात सत्ताधारी-विरोधकांमध्ये आरोप प्रत्यारोपाच्या जोरदार फैरी झाडल्या गेल्या आहेत. अनेक ठिकाणी मतदान केंद्रांवर गोंधळ घालण्याचे, ताब्यात घेण्याचे प्रकार घडले आहेत. याच्या तक्रारी देखील निवडणूक आयोगाकडे झालेल्या आहेत. लोकसभा निवडणुकीसोबत ओडिशा, आंध्र प्रदेश, अरुणाचल प्रदेश आणि सिक्कीम या चार राज्यांच्या विधानसभा निवडणुकाही पार पडल्या आहेत. यापैकी अरुणाचल आणि सिक्कीम विधानसभा निवडणुकांचे निकाल २ जूनला जाहीर होणार आहेत. तर ओडिशा आणि आंध्र प्रदेशचे निकाल ४ जूनला सार्वत्रिक निवडणुकांच्या निकालांसह जाहीर होणार आहेत.

## जाहीरनामा

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार चाकूर, यांचे कार्यालय (दंडणीय विभाग)**

जा.क्र. २०२४/एमएजी/कावि दि. ३०/५/ २०२४

अर्जदार :– श्री. धानुरे आरफातबेगम जमीर

विरूध्द

गैरअर्जदार:– मुख्याधिकारी नगर पंचायत / ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कार्यालय, आटोळा

कोर्टाचा शिक्का

अर्ज :– कलम १३(३) जन्म–मृत्यु नोंदणी कायदा.

याव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार श्री. धानुरे आरफातबेगम जमीर रा.आटोळा ता. चाकुर जि. लातुर यांनी १३ (३) जन्म–मृत्यु कायदा अंतर्गत अर्जदार यांचा स्वतः चा जन्म दि. ०७/०६/२००३ रोजी राहत्या घरी झाला असुन मुख्याधिकारी नगर पंचायत / ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कार्यालय आटोळा ता. चाकुर जि. लातुर येथे जन्म नोंद नसल्याने तीच्या जन्म तारखेची नोंदनी मुख्याधिकारी नगर पंचायत / ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कार्यालय आटोळा ता. चाकुर जि. लातुर येथे करणे कामी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर जन्म तारखेच्या नोंदणीसाठी कोणाच्याही कुठल्याही प्रकारचे आक्षेप अथवा हरकती असल्यास त्यांनी हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात सादर कराव्यात. सदर कार्यालयामध्ये कोनाच्याही आक्षेप अथवा हरकती प्राप्त न झाल्यास हे न्यायालय योग्य तो आदेश पारीत करेल. मुदतीनंर प्राप्त झालेल्या आक्षेपांचा अथवा हरकतीचा विचार करण्यात येणार नाही.

दि.३०/५/ २०२४ पुढील तारीख २/ ७ / २०२४

**आदेशावरून**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार, तहसील कार्यालय, चाकुर**

## जाहीरनामा

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार चाकूर, यांचे कार्यालय (दंडणीय विभाग)**

जा.क्र. २०२४/एमएजी/कावि दि. ३०/५/ २०२४

अर्जदार :– धानुरे सिद्दीक आमीनसाब

विरूध्द

गैरअर्जदार :– मुख्याधिकारी नगर पंचायत / ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कार्यालय, आटोळा

कोर्टाचा शिक्का

अर्ज :– कलम १३(३) जन्म–मृत्यु नोंदणी कायदा.

याव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार श्री. धानुरे सिद्दीक आमीनसाब रा. आटोळा ता. चाकुर जि. लातुर यांनी १३ (३) जन्म–मृत्यु कायदा अंतर्गत अर्जदार यांचा स्वतः चा जन्म दि. ०४/०५/१९७६ रोजी राहत्या घरी झाला आसुन मुख्याधिकारी नगर पंचायत / ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कार्यालय आटोळा ता. चाकुर जि. लातुर येथे जन्म नोंद नसल्याने तीच्या जन्म तारखेची नोंदनी मुख्याधिकारी नगर पंचायत / ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कार्यालय आटोळा ता. चाकुर जि. लातुर येथे करणे कामी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर जन्म तारखेच्या नोंदणीसाठी कोणाच्याही कुठल्याही प्रकारचे आक्षेप अथवा हरकती असल्यास त्यानी हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात सादर कराव्यात. सदर कार्यालयामध्ये कोनाच्याही आक्षेप अथवा हरकती प्राप्त न झाल्यास हे न्यायालय योग्य तो आदेश पारीत करेल. मुदतीनंर प्राप्त झालेल्या आक्षेपांचा अथवा हरकतीचा विचार करण्यात येणार नाही.

दि. ३०/८ / २०२४ पुढील तारीख ०२/७/२०२४

**आदेशावरून**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार, तहसील कार्यालय, चाकुर**

## जाहीरनामा

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार चाकूर, यांचे कार्यालय (दंडणीय विभाग)**

जा.क्र. २०२४/एमएजी/कावि दि.३०/५/ २०२४

अर्जदार :– धानुरे जफर जमिर

विरूध्द

गैरअर्जदार :– मुख्याधिकारी नगर पंचायत / ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कार्यालय, आटोळा

कोर्टाचा शिक्का

अर्ज :– कलम १३(३) जन्म–मृत्यु नोंदणी कायदा.

याव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार श्री. धानुरे जफर जमिर रा.आटोळा ता. चाकुर जि. लातुर यांनी १३ (३) जन्म–मृत्यु कायदा अंतर्गत अर्जदार यांचा स्वतः चा जन्म दि. २५/०४/२०११ रोजी राहत्या घरी झाला आसुन मुख्याधिकारी नगर पंचायत / ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कार्यालय आटोळा ता. चाकुर जि. लातुर येथे जन्म नोंद नसल्याने तीच्या जन्म तारखेची नोंदनी मुख्याधिकारी नगर पंचायत / ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कार्यालय आटोळा ता. चाकुर जि. लातुर येथे करणे कामी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर जन्म तारखेच्या नोंदणीसाठी कोणाच्याही कुठल्याही प्रकारचे आक्षेप अथवा हरकती असल्यास त्यानी हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात सादर कराव्यात. सदर कार्यालयामध्ये कोनाच्याही आक्षेप अथवा हरकती प्राप्त न झाल्यास हे न्यायालय योग्य तो आदेश पारीत करेल. मुदतीनंर प्राप्त झालेल्या आक्षेपांचा अथवा हरकतीचा विचार करण्यात येणार नाही.

दि. ३०/५/ २०२४ पुढील तारीख ०२/०७/२०२४

**आदेशावरून**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार, तहसील कार्यालय, चाकुर**

## जाहीर प्रगटन

गाव, शहर, तालुका, जिल्हा लातूर तसेच इतर तमाम जनतेस व हितसंबंधीतास माझे पक्षकार यांनी दिलेल्या माहिती व कागदपत्रावरून व दिलेल्या अधिकारावरून या जाहिर प्रगटनाद्वारे सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार यांचे वडील नामे लक्ष्मण बापू ऊर्फ बाबू खंदाडे (खंडाळे) हे दि. १४–०२–२००३ रोजी व आई नामे गंगाबाई लक्ष्मणराव खंदाडे या दि.०५–०३–२०१२ रोजी मौ. भातांगळी ता. जि. लातूर येथे मयत झाले आहेत. मयत लक्ष्मण बापू ऊर्फ बाबू खंदाडे (खंडाळे) यांच्या नावे मौ. भातांगळी येथे सीटी सर्वे क्र.५३४ याचे क्षेत्र ६४.०० चौ. मी. व सीटी सर्व्हे क्र.५५३ याचे क्षेत्र १३०.०० चौ. मी. आहे.

मयत बापू ऊर्फ बाबू खंदाडे (खंडाळे) व मयत गंगाबाई लक्ष्मणराव खंदाडे यांच्या पश्चात व उपरोक्त सदर मिळकतींचे १. लिंबराज लक्ष्मणराव खंदाडे, २. शिवकांता महादेव येलगटे, ३. मंगल उत्तमराव गुरमे, ४. केसर व्यंकट सारोळे, ५. आशा दत्तात्रय वरूरे, ६. अनुसया प्रल्हाद उगीले, ७. जनाबाई एकनाथ कैले हे सर्व कायदेशीर वारस आहेत. सदर वारसाशिवाय मयतास व त्यांच्या नावावरील मिळकतीस इतर कोणीही वारस नाहीत व सदर वारस हे एकमेव वारस असल्याची खात्री दिली आहे.

तरी या जाहीर नोटीसद्वारे तमाम जनतेस व हितसंबंधीतास सुचित करण्यात येते की, जर मयत बापू ऊर्फ बाबू खंदाडे (खंडाळे) व मयत गंगाबाई लक्ष्मणराव खंदाडे यांच्या पश्चात व उपरोक्त सदर मिळकतीबाबत उपरोक्त वारस नसल्याचा अथवा त्यांच्याशिवाय इतर कोणीही वारस असल्याचा कोणाचा कांही आक्षेप अथवा उजर असेल त्यांनी त्यांचा लेखी आक्षेप माझ्या खाली नमुद पत्त्यावर ०५ (पाच) दिवसात पुराव्यासह पोच करावा. जर मुदतीमध्ये कोणाचा कांही आक्षेप अथवा उजर आला नाही तर उपरोक्त मयताचे व त्यांच्या नावावरील वारस असल्याचे सर्व कायदेशीर वारस म्हणून सदर मिळकतीवर त्यांची नावे नोंदवतील तरी याची तमाम जनतेने व हितसंबंधीतांनी नोंद घ्यावी.

सबब ही जाहीर नोटीस.

देणार

**लिंबराज लक्ष्मणराव खंदाडे**
रा. भातांगळी,
ता. जि. लातूर
मो.९३७०६ ३३८५८

तर्फे

**ॲड. अजय एच. इळेगावकर,**
रामेश्र्वर स्टील वर्क जवळ,
संभाजी नगर, वाडगाव रोड,
लातूर मो. ९९६०२८६००१

**लोकमान्य अर्बन क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि. उदगीर**
**नगरपरिषद, उदगीर जि. लातूर संस्थेच्या विविध ठेवी योजना**

| कालावधी | व्याजदर |
|---|---|
| ३० ते ४५ दिवस- | ५.५०% |
| ४६ ते १८० दिवस | ७.५०% |
| १८१ ते ३६५ दिवस | ८.५०% |
| १२ महिने ते २४ महिने | ९.७५ % |
| २४ महिने ते ३६ महिने | १०.५०% |
| ३६ महिने ते ६० महिने | ११% |
| लोकमान्य मासीक व्याज प्राप्ती ठेव योजना | १०% |

**९% आवर्त ठेव द.सा.द.शे,** ०.५०% अधिक व्याजदर जेष्ठ नागरीक व महिला, दाम दुप्पट, ७८ महिने, वैयक्तिक कर्ज व इतर कर्ज १६%, सोने तारण कर्ज १४%, वेअर हाऊस कर्ज १६%, वरिल सर्व ठेवीवर नियम व अटी लागु.





# यशवंत

रविवार दि. २ जून २०२४

पान ८

# उदगीर

कार्यालय :०२३८५-२५३११८ मो.९८५०२२८२४०

email - yashudgirram@gmail.com



**बालाजी अर्बन को-ऑप, क्रेडीट सोसायटी लि.**

**शिवाजी चौक मोंढा रोड, मार्केट यार्ड, उदगीर, पिन ४१३५१७**

| कालावधी | व्याजदर | जेष्ठ नागरिक व महिलांसाठी व्याजदर |
|---|---|---|
| ३१ दिवस ते ४५ दिवस | ६.००% | ६.५०% |
| ४६ दिवस ते १८० दिवस | ७.००% | ७.५०% |
| १८१ दिवस ते ३६५ दिवस | ८.००% | ८.५०% |
| १ वर्ष १ महिना ते २ वर्ष | ९.००% | ९.५०% |
| २ वर्ष १ महिना ते ३ वर्ष | ९.२५% | ९.७५% |
| ३ वर्षापुढील मुदतीकरीता | १०.००% | १०.५०% |

मासिक प्राप्ती योजना :- आज रुपये १,००,०००/- भरा आणि दर महिन्याला रु.८०६/- मिळवा, मुदती नंतर रु.१,००,०००/- परत मिळवा. (सदरील योजना ३० महिने मुदतीकरिता उपलब्ध.) (९.७५%)
दाम दुप्पट योजना :- रुपये १,००,०००/- भरा आणि ८३ महिन्यामध्ये मिळावा रुपये २,००,०००/- (१०.१४%)

**उपलब्ध सुविधा**
वेअरहाउस लोन, गोल्ड लोन, कर्ज प्रक्रिया, जलद सेवा, एसएमस बँकींग, मोबाईल बँकींग






# उदगीरात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती उत्साहात साजरी

**उदगीर (प्रतिनिधी)** तहसीलदार बोरगावकरांनी अरसनाळ महानगाव येथील शेतकऱ्यांना अतिक्रमित रस्ता खुला करून दिला न्याय.

उदगीर तालुक्यातील आरसनाळ महानगाव येथील सर्वे नंबर ४३ मधील गावठाणाचे पश्चीमेकडुन नागराळ शिव जाणारी गाव नकाशावरील गाडीवाट गेल्या पन्नास वर्षापासुन अर्ध्यामधात अतिक्रमणात अडकल्याने वर्षानुवर्ष हिचा वापर न केल्याने व दुतर्फा असलेले शेतकरी यांनी या रस्त्यानेच आमच्या शेतात अतिक्रमण केले आहे असे म्हणुन त्यानी पायवाट केली होती .

तहसीलदार राम बोरगावकर,यांच्या आदेशानुसार आज हि गाडीवाट शेतकऱ्यांना अतिक्रमणमुक्त करण्यात येवुन रस्ता खुला करून न्याय दिला.

वर्षा ठाकुर घुगे जिल्हाधिकारी लातुर यांचा शेत रस्ते अतिक्रमणमुक्त करणे हा प्राधान्य क्रमानुसारचा विषय असुन उपविभागीय अधिकारी सुशांत शिंदे यांचे मार्गदर्शनाखाली तहसीलदार राम बोरगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली पुरवठा तहसीलदार नायब शिवशंकर बेंबळगे , मंडळ अधिकारी वाढवणा गणेश हिवरे अतिरिक्त देवर्जन,भूमी अभिलेख कार्यालयाचे मोजणीदार दिनेश पल्लेवाड,पोलीस खात्याचे देवणी पोलीस स्टेशन अंतर्गत धनेगाव बिट जमादार सुग्रीव कोंडामंगले, पो.कॉ. अभिजीत डोईजड, प्रवीण गिरी होमगार्ड,दत्तात्रय मोरे तलाठी सज्जा दावणगाव,कोतवाल समाधान नांदेडकर यांनी जायमोका पाहणी करुन जायमोक्याप्रमाणे नकाशातील गाडीवाटेचा कोंडलेला श्वास मोकळा करुन या शिवारातील शेतकरी यांना हा रस्ता शेतीकडे जाण्यासाठी मोकळा करुन देण्यात आला. हा रस्ता अतिक्रमणमुक्त करण्यासाठी विष्णु मोरे,महेश मोरे,बालाजी वरटी,श्रीपाल माने,प्रभाकर माने,नामदेव माने,प्रकाश चामले,सुरेश धट्टे ,शिवाजी तेलंग,अनंत विठ्ठल अरसनाळकर ,राम चामले यांनी सहकार्य केले.

# साईनाथ माध्यमिक विद्यालयाचे १० वी परिक्षेत यश







**उदगीर (प्रतिनिधी)** साईनाथ माध्यमिक विद्यालय नविन वसाहत मलकापुर या शाळेचा १० वी बोर्ड परिक्षेत शाळेतील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. नवीन वसाहत नळेगाव रोड मलकापुर येथील साईनाथ माध्यमिक विद्यालयाचा १० वी परिक्षेचा निकाल १०० टक्के लागला असुन शाळेतील विद्यार्थ्यांनी मरेवाड प्रशांत धोंडिराम या विद्यार्थीनीने ९२.२० टक्के गुण घेवून केंद्रात प्रथम क्रमांक पटकाविला आहे. कु. गायकवाड पोर्णिमा गौतम या विद्यार्थीनीने ९० टक्के गुण घेवून द्वितीय क्रमांक तर गायकवाड अनुजा विजयकुमार या विद्यार्थीनीने ८८ टक्के गुण घेवून तृतीय क्रमांक पटकाविला आहे.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे, सचिव भागशेट्टे बालाजी मल्लिकार्जुन, मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारीयांनी या यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# देवणीत जिल्हास्तरीय शेतकरी मेळाव्याचे आयोजन

## शेंद्रीय शेती काळाची गरज विषयावर होणार चर्चा

**देवणी (प्रतिनिधी)** विषमुक्त शेती विषमुक्त अन्न अभियानाच्या माध्यमातून काळी आई वाचवा उपक्रमाचा एक भाग म्हणून येथील धनूरे मंगल कार्यालयात रविवारी (ता.०२) सकाळी १० वाजता शालुकाआई प्रतिष्ठाणच्या वतीने जिल्हा स्तरीय शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. सदर शेतकरी मेळाव्यात शेंद्रीय शेती काळाची गरज या विषयावर चर्चा सत्राचे आयोजन करण्यात आले आहे.

याशेतकरीमेळाव्याच्या अध्यक्षस्थानी पुणे येथील तात्यासाहेब इंगळे हे उपस्थीत राहणार आहेत तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून निजाम शेख आसणार आहेत. प्रमुख उपस्थितीत देवणी तहसील चे तहसीलदार गजानन शिंदे,क्रषी उत्पन्न बाजार समिती चे माजी सभापती गोविंदराव भोपणीकर,जिल्हा कृषी अधिक्षक आधिकारी आर.टी. जाधव, उपविभागीय कृषी अधिकारी आर. एन.काळे,तालुका कृषी अधिकारी एस.आर. पाटील, डॉक्टर सेलचे जिल्हा अध्यक्ष डॉ. आरविंद भातांब्रे, स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ दिपक सोमवंशी, वैद्यकीय आधिकारी डॉ. पांडुरंग कलंबरकर,शेतकरी ब्रिगेडचे संस्थापक अध्यक्ष दत्ताभाऊ खंकरे,माजी महिला बालकल्याण सभापती कुशावर्तीताई बेळे, शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष राजकुमार सस्तापुरे, चेअरमन रामकिशन गडिमे,देवर्जन चे सरपंच अभिजीत साकोळकर, जेष्ठ पत्रकार दत्ता पाटील तळेगावकर,मनोज पाटील, शाम जाधव, शफिक पटेल, ईरशाद शेख, नागनाथ गडिमे, बालाजी तोंडारे, शासकीय पुरस्कार प्राप्त शेतकरी ओमकार मस्कले, प्रयोगशील शेतकरी कल्याण धनूरे आदींची उपस्थिती लाभनार आहे.जिल्ह्यातील सर्व शेतकरी बांधवांनी शेंद्रीय शेती बद्दल मार्गदर्शनाचा लाभ घेण्याचे आवाहन

प्रतिष्ठाणच्या वतीने बालाजी टाळीकोटे ,जाकीर बागवान,सचिन मंगनाळे, ज्ञानेश्वरभाऊ सुर्यवंशी, इश्वर सुर्यवंशी, शिवाजी आंबेगावे, शादुल बौडीवाले, शिवशंकर जिवणे, सय्यदअल्ली शेख,अमजद शेख, कमलाकर म्हैत्रे, विकास जाधव, वनमाला भंडे , संध्या पाटील,रणदिवे लक्ष्मण,रणदिवे सरोजा,लता गायकवाड, नागमा पटवारी, रूक्मीनबाई फड, सुनिता फड, भाग्यश्री कावर,गंगाधर कावर, जनाबाई भुगे, छाया दगडे,बोईनवाड शंकर, सावळे सोमनाथ, टिळे गजानन, गरिबे विश्वनाथ, शंकर गरिबे,चंद्रकांत मुंडे, जितेंद्र सुर्यवंशी, दशरथ कांबळे आर्दीनी केले आहे.

# उदगीरात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती उत्साहात साजरी



**उदगीर (प्रतिनिधी)** येथील धनगर सोसायटी येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून व ध्वजारोहण करून पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांच्या प्रतिमेची शहरात मिरवणुक काढण्यात आली. ही मिरवणूक लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याला अभिवादन करून ढोल ताशांच्या गजरात, वाजत गाजत, येळकोट येळकोट जय मल्हारच्या घोषणा देत, पिवळा भंडारा उधळून आसमंत पिवळे करत, नाचत नाचत ही मिरवणूक भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करून, राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना अभिवादन करून, महात्मा बसवेश्वर त्यांच्या पुतळ्यास अभिवादन करून, छत्रपती शिवाजी महाराजांना मानवंदना देऊन, छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांना अभिवादन करून पुण्यश्लोक अहिल्यादेवी स्मारक येथे आल्यानंतर या मिरवणुकीचे सभेत रूपांतर झाले. या अभिवादन सभेच्या व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष, सामाजिक नेते मोहनराव खिंडीवाले, प्रमुख पाहुणे म्हणून लातूर -बीड- धाराशिवचे कामगार आयुक्त मंगेश झोले, डॉ. के.टी. ढोणे, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस महिला आघाडीच्या सरचिटणीस उषा कांबळे, आदर्श शिक्षक पुरस्कारप्राप्त सुर्यकांत भोसले सह अन्य मान्यवर उपस्थित होते. अभिवादन सभेची सुरुवात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी देशासाठी सेवा देणाऱ्या आजी-माजी सैनिकांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. त्यानंतर दहावी व बारावीच्या परीक्षेत विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करून कौतुक करण्यात आले. त्यानंतर रूपाली मेहेत्रे आणि गणेश बळते या दोन विद्यार्थ्यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा जीवन चरित्र सर्व समाजासमोर रेखाटले. त्यानंतर मेजर शिवाजीराव शिंदे यांनी अहिल्यादेवीचे कार्य सविस्तर विशद केले. मंगेश झोले यांनी, कामगार कल्याण विभागाच्या सर्व योजना ग्रामीण भागातील दुर्बल घटकांपर्यंत कशा पोहोचवता येतील, त्याचा त्यांना कसा लाभ घेता येईल याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. प्रमुख मार्गदर्शक सुर्यकांत भोसले यांनी, अहिल्यादेवी होळकरांच्या कार्याचे तसेच धनगर समाजाचे विविध पक्षाकडून वेळोवेळी होणारे राजकीय खच्चीकरण टाळण्यासाठी व पुनश्च राजकारणात भरारी घेण्यासाठी आपल्या पूर्वजांचा इतिहास लक्षात घेऊन आपणही राजसत्तेचे भागीदार झाले पाहिजे आणि प्रशासकीय सेवेमध्ये आपल्या मुलांना जास्तीत जास्त संख्येने पाठवण्यासाठी उच्च दर्जाचे शिक्षण देणे गरजेचे असल्याचा उल्लेख केला. उषा कांबळे यांनी, धनगर समाजाला आजपर्यंत न मिळालेले एसटी आरक्षण यापुढे महाविकास आघाडी सत्तेत आल्यास ते मिळवून देण्यासाठी प्रयत्न करीन असे आश्वासन दिले. अध्यक्षीय समारोपामध्ये मोहनराव खिंडिवाले यांनी सर्व समाज संघटित होऊन संघर्ष केल्यास निश्चितपणे आपल्याला अपेक्षित यश मिळते त्यासाठी सर्वांनी शिकावे संघटित व्हावे आणि संघर्ष करावे असा संदेश दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सायराम श्रीगिरे यांनी केले. सुत्रसंचालन हनुमंतराव मेहत्रे यांनी तर आभारप्रदर्शन प्रा. दिलीप चौधरी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जन्मोत्सव समिती उदगीरचे गोविंदराव मेहेत्रे, पी.बी. बालूरे, ज्ञानोबा भाकसखेडे, माधव बळते, डी.पी. देवकते, शेषराव इंचुरे, हणमंतराव खिंडीवाले, वैजनाथ बदनाळे, शेषेराव भाकसखेडे, व्यंकटराव कोकणे, बसवराज बदनाळे, टी.के. रुपनर, धूळप्पा मालचापुरे, ज्ञानोबा बफछडे, परमेश्वर खटके, राजकुमार सताळे, नरसिंग जाणते, पांडुरंग उदगिरे, रवी सताळे, संतोष केसगिरे यांनी परिश्रम घेतले.

# संत सावतामाळी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे यश



**उदगीर (प्रतिनिधी)** संत सावतामाळी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय दावणगाव या विद्यालयाचे शालांत प्रमाणपत्र परीक्षेत घवघवीत यश

संत सावतामाळी माध्यमिक विद्यालयाचे नुकत्याच झालेल्या उच्च माध्यमिक व शालांत प्रमाणपत्र परीक्षेत शाळेने घवघवीत यश संपादित केले. यामध्ये बारावीचा निकाल ९६% लागलेला असून सर्वप्रथम देशमुख शुभांगी राजेंद्र ७५ टक्के प्रथम क्रमांक.

दहावी मध्ये केंद्रामधून सर्वप्रथम येण्याचा बहुमान फफुले अमृता तानाजी ९७% सर्व द्वितीय साखरे स्नेहा अर्जुन ९३% तृतीय भडे गौरव महेश ९१.४०% टक्के व भोसले प्राची शुद्धोधन ९१.४०% शाळेचा निकाल शंभर टक्के लागलेला असून विशेष प्राविण्यासह २७ विद्यार्थी तर प्रथम श्रेणीमध्ये ११ विद्यार्थी तर द्वितीय श्रेणीमध्ये चार विद्यार्थी उत्तीर्ण झालेले आहेत तसेच गणित विषयात शंभर पैकी १०० गुण मिळवलेले दोन विद्यार्थी आहेत.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री बालाजीराव फफुले सचिव श्री तानाजीराव फुले दावणगाव चे चेअरमन रमेश भंडे व्हा. चेअरमन धनाजी भाऊ मुळे यशवंत ढगे मुख्याध्यापक श्री शिवहार रोडगे सर व शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले


**तत्काळ नेमणूका**

**श्यामलाल स्मारक शिक्षण संस्था, उदगीर**

विना अनुदानित खालील पदे तात्पुरत्या स्वरुपात व तत्काळ भरणे आहेत.

**(ग्रंथालय अनुदानित)**

| पद | संख्या | पात्रता |
|---|---|---|
| ग्रंथपाल | १ | B lib/ M lib/ Ltc |
| उप ग्रंथपाल | १ | B lib/ M lib/ Ltc |
| लिपीक | १ | संगणक/Tally |
| सहशिक्षक/शिक्षिका (बालवाडी सेमी इंग्रजी) | १ | बालवाडी कोर्स/D.ed (संगणक व इंग्रजी) |

उमेदवारांनी त्वरित कागदपत्रांसह संपर्क करावा. अन्यथा ३.६.२०२४ रोजी दुपारी १ ते ३ दरम्यान संस्था कार्यालय, उदगीर येथे यावे. प्रथम येणाऱ्यास योग्यतेनुसार प्राधान्य दिला जाईल.

संपर्क : ८००७९६०८०३

दिनांक : ३१.५.२०२४

आस्थापना सचिव — समिती अध्यक्ष